120

फक्त कार्यालयीन उपयोगासाठी

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग

# आदिवासी हस्तकलेच्या विकासासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचा सहभाग.

TRTI
MAHARASHTRA STATE PUNE

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
महाराष्ट्र राज्य, २८, क्वीन्स गार्डन,
पुणे - ४११ ००१.

१९९४-९५

## प्रस्तावना

आदिवासी युवकांमध्ये तसेच आदिवासींच्या तरुण पिढीमध्ये आदिवासींमधील पारंपारिक हस्तकलांचा प्रसार व्हावा, हस्तकलेला उत्तेजन मिळावे व आदिवासी हस्तकलेला बाजारपेठ मिळावी, या उद्देशाने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत दरवर्षी हस्तकला प्रदर्शन आयोजित केले जाते. यामध्ये गडचिरोली, यवतमाळ, अमरावती, नागपूर, रायगड, रत्नागिरी, ठाणे, नाशिक, पुणे, अहमदनगर, अकोला इ.जिल्ह्यातील आदिवासी हस्तकलाकार आपल्या हस्तकलाकृतीसह हजेरी लावत असतात व प्रदर्शनात सहभागी होत असतात. या प्रदर्शन कालावधीमध्ये हस्तकलाकारांची राहणे व निवारा व्यवस्था संस्थेमार्फत मोफत करण्यात येते. त्यांना जाण्या-येण्याच्या खर्चासह प्रदर्शनाचा स्टॉलही मोफत पुरविण्यात येतो. या व्यतिरिक्त आदिवासी हस्तकला तयार करणाऱ्या व आदिवासी हस्तकलेच्या प्रशिक्षण देणाऱ्या व्यक्ती व संस्थाही आदिवासी हस्तकलेचे प्रसाराचे महत्वपूर्ण कार्य करीत असतात. अशा संस्थांचा व व्यक्तींचा अभ्यास प्रस्तुत अहवालात करण्यात आलेला आहे. तथापि, आदिवासी हस्तकलाकारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढले आहे का ? त्यांच्या कलाकृती शहरी भागातील जनतेपर्यंत पोहोचतात काय ? आदिवासी हस्तकलाकृती निर्माण करण्यामध्ये आदिवासींना कोणकोणत्या तांत्रिक अडचणींना तोंड द्यावे लागते, कच्च्या मालाची व बाजारपेठेची उपलब्धता कशी करुन देता येईल या सर्व बाबींचा आढावा घेण्यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्यात मूल्यमापन कक्षाने हा मूल्यमापन अहवाल हाती घेतला आहे. या साठी या प्रदर्शनासाठी आलेल्या २६ हस्तकलाकारांची नमुना निवड करण्यात आली. त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करुन माहितीचे संकलन करण्यात आले. त्यामुळे आलेले निष्कर्ष सर्वसाधारणपणे कमी अधिक प्रमाणात सर्व हस्तकलाकारांना व हस्तकला संस्थांना लागू पडण्यास हरकत नाही.

या संशोधन अहवालातून प्रामुख्याने एक गोष्ट प्रकर्षाने दिसून येते ती अशी की, हस्तकला संस्थाच्या विकासाचा वेग पाहिल्यास तुलनेने महिला सहकारी संस्थांची प्रगती अत्यंत समाधानकारक होत आहे. अर्थातच अशाप्रकारच्या महिला सहकारी संस्थांना प्राधान्य देऊन या संस्थांची संख्या वाढविल्यास घरकाम करुन उरलेल्या वेळात अर्थार्जन करण्याची संधी अनेक महिलांना मिळेल यात शंकाच नाही. या संस्थांचा गुणात्मक व संख्यात्मक दर्जा वाढविण्याची चर्चाही या अहवालातआली आहे.

सदर मूल्यमापन अहवाल करण्याचे काम या संस्थेतील सौ.मंगला घोडे, संशोधन अधिकारी यांचेकडे सोपविण्यात आले होते. उपसंचालक श्री.प्रकाश वाणी यांना त्यांना मार्गदर्शन केले. तसेच अहवाल टंकलेखनाचे काम श्री.के.पी.कुडे, यांनी पूर्ण केले.

तसेच या अहवालासाठी प्राथमिक माहिती घेण्यासाठी प्रदर्शनात सहभागी झालेल्या हस्तकलाकारांचे चांगले सहकार्य मिळाले.

सदर मूल्यमापन पाहणी अहवालातील निष्कर्ष, शिफारशी आदिवासी विभागात काम करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना तसेच संस्थेतील अधिकाऱ्यांनाही उपयुक्त ठरतील. अशी खात्री वाटते.

पुणे

दिनांक २९/६/९५

(डॉ.नवीनचंद्र जैन)
संचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे २

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | १-२ |
| २. | मूल्यमापन अभ्यासाची उदिष्टये व संशोधन पध्दती | ३-५ |
| ३. | आदिवासी हस्तकलेला उत्तेजन देण्यासाठी राबविण्यात येणारे उपक्रम | ६-१३ |
| ४. | वैयक्तिक लाभार्थी प्रकरणांचा अभ्यास | १४-२२ |
| ५. | सर्वेक्षण पाहणीतील माहितीचे पृथःकरण | २३-५० |
| ६. | निष्कर्ष | ५१-५७ |
| ७. | सूचना तथा शिफारशी | ५८-६२ |
| ८. | प्रपत्र क्रमांक १ | |

# प्रकरण 1 ले

## प्रस्तावना

भारतीय संस्कृतीतील अभिजात कलाकृतींचा आदर्श नमुना म्हणून आदिवासी हस्तकलांचा निर्देश करण्यास हरकत नाही. जनजीवनाकडे पाठ फिरवून अतिशय दुर्गम भागात डोंगरद-यात राहणारे निसर्गाशी रममाण झालेले आदिवासी जेव्हा नैसर्गिक साधनसामुग्रीमधून वस्तुनिर्मिती करतात तेव्हाचे त्यांचे हस्तकौशल्य हे निव्वळ वाखाणण्याजोगे असते. बांबू आणि वेतापासून बनविलेल्या निरनिराळ्या वस्तु, जंगलात सापडणारे रंगीबेरंगी दगड, हाडांचे तुकडे, शिंपा, धातू यापासून बनविलेले दागदागिने, धातूच्या मूर्ती व लाकडावरील कोरीव काम, लाकडी मुखवटे, पारंपारिक वाद्ये, गवताच्या पिशव्या-टोप्या, शिकारीची आयुधे व साधने, भिंतीवरील तसेच धार्मिक कार्यातील प्रासंगिक चित्रकला, घरगुती उपयोगाच्या वस्तू अशा विविध वस्तुंच्या माध्यमातून आदिवासींच्या हस्तकौशल्याचे, त्यांच्यात दडलेल्या कलात्मकतेचे दर्शन घडते. आदिवासी निर्माण करीत असलेल्या या कलाकृतीमागचा त्यांचा उद्देश "कलाप्रदर्शन" हा नसतो. तर धार्मिक व सांस्कृतिक मूल्यांच्या प्रभावामुळे धार्मिक कार्यप्रसंगी निर्माण केलेली विशिष्ट प्रतिकात्मक अर्थ लाभलेली कलाकृती तसेच गरजेच्या उपभोग्य वस्तुची निर्मिती या उद्देशाने आदिवासींच्या विविध कलाकृती जन्म घेत असतात. आदिवासींच्या संस्कृती व मूल्ये प्रतिबिंबित करणा-या या विविध कलात्मक वस्तु दिवसेंदिवस दुर्मिळ होऊ लागल्या आहेत. लुप्त होऊ लागल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आदिवासी हस्तकलांचे जतन व्हावे, यासाठी प्रयत्नशील असलेल्या आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या आदिवासी हस्तकलेच्या विकासाकरिता सहभागाचा मूल्यमापनात्मक अभ्यास करणे उचित ठरते. या मूल्यमापन अभ्यास अहवालाचे महत्व लक्षात घेऊन या संस्थेने उपरोक्त विषयाचा मूल्यमापन अहवाल हाती घेतला आहे.

### (2) अभ्यासविषय आणि त्याचे महत्व

1991 च्या जनगणनेनुसार भारतातील एकूण लोकसंख्येपैकी (789.37) आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण 8.01 टक्के इतके आहे. त्यापैकी 9.27 टक्के आदिवासी लोकसंख्या महाराष्ट्रात वास्तव्य करीत आहे. सह्याद्री, सातपुडा व गोंडवन विभागातील पर्वतराजीत राहणारा हा आदिवासी समाज नगरहाटीपासून दूर निसर्गाच्या सानिध्यात स्वतःच्या चिमोठी विश्वात रममाण झाला आहे. त्यांच्यावर निसर्गाचा अत्यंत प्रभाव आहे. शहरी वातावरणापासून दूर दुर्गम भागात अतिशय प्रतिकुल बिकट आर्थिक परिस्थितीत गुजराण करणा-या आदिवासींची संस्कृती ही इतर संस्कृतीपेक्षा काहीशी वेगळी वैशिष्ट्यपूर्ण आहे. अनेक वेगवेगळ्या आदिवासी जमाती आणि या जमातींच्या भिन्नभिन्न अभिवृत्ती मिळून आदिवासी संस्कृती बनली आहे. त्यामुळे ही संस्कृती कोणत्याही एका विशिष्ट साच्यात बसविता येत नाही. अशा या वैशिष्ट्यपूर्ण आदिवासी संस्कृतीचे प्रतिबिंब आदिवासी लोककला, नृत्यकला व इतर संस्कृतीमध्ये उमटत असते. किंबहुना आदिवासींची नृत्यकला, लोककला, संगीत व हस्तकला या माध्यमातूनच आदिवासी संस्कृती आपल्या डोळ्यांसमोर मूर्तरुपात उभी राहत असते.

यातील "आदिवासी हस्तकला" रसिकांना आणि तज्ञांना आकर्षित करते. आदिवासी हस्तकौशल्यातून निर्माण होणारे दागदागिने, शृंगारसाधने, पारंपरिक वाद्ये, लाकडी नक्षीदार कोरीव काम असलेल्या विविध वस्तु, शिकारीची साधने, भिंतीवरील चित्रकला, देवदेवतांच्या मूर्ती, घरगुती उपयोगाच्या वस्तू, गवताच्या पिशव्या व टोप्या आदि रसिकांना मोहून टाकतात. तरीही संस्कृतीकरण, शहरीकरण, यंत्रोत्पादित वस्तूचे बाजारपेठेवरील आक्रमण, आदिवासी कलाकृती निर्माण करण्याबाबत असणारी उदासिनता, या वस्तु सर्वसामान्यापर्यंत पोहोचतील अशी प्रदर्शन व विक्री व्यवस्था नसणे व त्यामुळे या कलाकृतीच्या विक्रीतून उदरनिर्वाहास पुरेसे उत्पन्न मिळण्याची शाश्वती नसल्याने या व यासारख्या अन्य कारणामुळे आदिवासी हस्तकला कलाकृती या उपेक्षित राहिल्या. आदिवासींची हस्तकला ही भारतीय संस्कृतीचा एक वैशिष्ठ्यपूर्ण भाग आहे. त्यामुळे या हस्तकलांचा होणारा -हास हा केवळ समाजशास्त्रीय अथवा मानववंशशास्त्रीय समस्या नसून राष्ट्रीय समस्या आहे. या हस्तकलांचे जतन करणे, संवर्धन करणे हे एक राष्ट्रीय कर्तव्य आहे. म्हणून आदिवासी हस्तकलांचे जतन व संवर्धन करण्यासाठी पुणे येथील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था या कार्यालयात सहभागी असणा-या आदिवासी हस्तकलांच्या जोपासनेसाठी करीत असलेले कार्य, त्यावर असलेल्या मर्यादा तसेच या कामाची व्याप्ती वाढविण्यासाठी काही उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न करणे ह्या हेतूने हा अभ्यास अहवाल हाती घेतला आहे.

## प्रकरण 2 रे

## मूल्यमापन अभ्यासाचो उदिष्ट्ये व संशोधन पध्दतो

2•1 हा अहवाल आदिवासो हस्तकला जतन करण्याकरिता संवर्धित करण्याकरिता प्रयत्नशोल असणा-या संस्थेच्या कार्यप्रणालोवर आधारोत आहे• एका संस्थेच्या किंवा घटकांच्या कार्याचे मूल्यमापन करावयाचे असल्याने व्यष्टो अध्ययन पध्दतो ( Case Study method ) वापरणे योग्य ठरेल, असे वाटल्याने व्यष्टो अध्ययन पध्दतोचो निवड संशोधन पध्दतोमध्ये करण्यात आलो आहे• यामुळे संस्थेच्या कार्याचे सखोल अध्ययन करण्यास मदत झालो• या पध्दतोमुळे निवडलेल्या एककाचे सुक्ष्म व खुलासेवार अध्ययन करता येते• अध्ययन जास्त परिपूर्ण होण्याकरिता हो पध्दतो उपयुक्त ठरु शकते• या संशोधन पध्दतोत प्रत्यक्ष निरोक्षण, प्रश्नावलो, अनुसूचो, वैयक्तिक मुलाखतो या तंत्रावर भर देण्यात येतो• तसेच प्राथमिक स्त्रोताबरोबर द्वितोय स्त्रोतातून म्हणजे विविध कागदपत्रे, संदर्भ पुस्तके, प्रशासकोय कागदपत्रे आदितून तथ्य गोळा करण्यास वाव मिळतो• त्यामुळेच संस्था स्थापना झाल्यापासून आदिवासो हस्तकलेच्या विकासाकरिता संस्थेने राबविलेल्या गतकालोन विविध उपक्रमांचो माहितो मिळविता आलो• तसेच संस्थेच्या संग्रहालयाचे अभिरक्षो व या कार्यक्रमांचे कार्यान्वयन अधिकारो यांचो याबाबतचो मते जाणून घेता आलो•

2•2 हा अहवाल अंतिमतः हस्तकलाविषयाचा असल्यामुळे त्याचा त्याविषयाचा दृष्टोकोन समजून घेणे हे जास्त महत्वाचे आहे• आदिवासांच्या स्वतःच्या कलाकृतोकडे बघण्याचा दृष्टोकोन, त्यापासून त्यांना सद्यपरिस्थितोमध्ये होणारा लाभ, भविष्यात यातून निर्माण होणारा रोजगार/उत्पन्न याबाबतचो त्यांचो मते, त्यांना शासनाकडून अभिप्रेत असणारो आर्थिक मदत, या सर्व पैलुंबाबत हस्तकलाकारांकडून त्यांचो मते, विचार जाणून घेणे संयुक्तिक ठरेल हे लक्षात घेऊन आदिवासो हस्तकलांकरिता एक प्रश्नावलो तयार करण्यात आलो• हा कलाकार कोणा एका विशिष्ट भूभागात राहणारा असेलच असे नाहो• त्यामुळे क्षेत्रोय पाहणोकरिता विभागांचो प्रथम निवड आणि लाभार्थ्यांचो नंतर निवड करणे हो नेहमोचो पध्दत इथे बाजूला ठेवण्यात आलो• हस्तकलाकार कुठे राहणारा आहे, यापेक्षा तो "कलाकार" आहे या संकल्पनेत बसतो को नाहो या गोष्टोवर विशेष भर देण्यात आला आणि त्यानुसार हस्तकलाकारांचो निवड करण्यात आलो• सुरवातोला नमूद केल्याप्रमाणे "कलाकार" हो संकल्पना लावत असताना त्याचो सृजनात्मकता, घाटबांधणो, नक्षोकाम, कामातोल कसब व त्याच्या कलाकृतोवर उमटणारा आदिमत्वाचा ठसा हे सर्व निकष वापरण्यात आले• अर्थात अशाप्रकारे निवड केलो असतानाहो महाराष्ट्रातोल सह्याद्रो व गोंडवन विभागातोल कलाकारांचा समावेश नमुना निवडोमध्ये झाला हे नमूद करणे उचित ठरेल• महाराष्ट्रातोल हस्तकलाकारांच्या कलाकृतो या अहवालाच्या निमित्ताने नव्याने पाहण्यात आल्या व हस्तकलाकारांकडून प्रश्नावलो भरुन

घेण्यात आल्या. या अहवालाकरिता-

1. अभिरक्षी/कार्यान्वयन अधिकारी
2. हस्तकलाकार
3. संस्थांचे व्यवस्थापक

यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन प्रश्नावली भरण्यात आल्या. तसेच याविषयी कार्यान्वयन अधिकारी, कलाकारांशी अनौपचारिक चर्चा करुन माहिती मिळविण्यावरही भर देण्यात आला.

2.3 या अहवाल संदर्भात कामकाज चालू असताना "आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था" या संस्थेमार्फत पुण्यात सी.एम.शहा हॉल इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स, शिवाजीनगर, पुणे येथे 22.11.1994 ते 29.11.1994 या कालावधीत आदिवासींच्या विविध हस्तकलाकृतींचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. या अहवालाच्या संशोधन गटाने उपरोक्त प्रदर्शनास भेट देऊन प्रदर्शनाची आखणी कशी केली जाते, याची तसेच हस्तकलाकारांच्या वस्तु व वस्तुंची विक्री व्यवस्था याची पाहणी केली. त्याचबरोबर प्रदर्शन बघण्यास येणा-या नागरिकांच्या व तज्ञांच्या आणि हस्तकलाकारांच्या मतांचे संकलन केले. विक्रीची आकडेवारी, संस्थेच्या व कलाकारांच्या समस्याही या निमित्ताने जाणून घेण्यात आल्या.

2.4 या मूल्यमापन अहवालाच्या संदर्भात आदिवासी हस्तकलाकृती निर्मितीला भविष्यात कुटीरोद्योगाचे, स्वयंरोजगाराचे स्वरुप प्राप्त करुन देता येईल का ? या स्वरुपात कोणत्या अडचणी उद्भवू शकतात ? या प्रश्नांचा आढावा घेण्याकरिता पुणे येथील "जिल्हा उद्योग केंद्र" कार्यालयास भेट देऊन तेथील अधिका-यांशी अनौपचारिक चर्चा करण्यात आली व त्या संदर्भातील आवश्यक माहिती गोळा करण्यात आली.

2.5 उपरोक्त नमूद केलेल्या विविध माध्यमातून व तंत्रपध्दतीतून संकलित केलेली तथ्ये, निरीक्षणे व निष्कर्ष यांचा गोषवारा या अहवालातून मांडण्यात आला आहे. आदिवासी हस्तकला विकासाच्या दृष्टीकोनातून अनेक उपयुक्त पैलुंवर व समस्यांवर या संदर्भात प्रकाशझोत टाकण्यास या माध्यमांचा उपयोग झाला आहे.

2.6 हा अभ्यास अहवाल तयार करण्याकरिता खालील प्रमुख उद्दिष्टे नजरेसमोर ठेवण्यात आली आहेत :-

मूल्यमापन अहवालाची उद्दिष्टये :-
---------------------------

1. आदिवासी हस्तकलेचे प्रकार, महत्व व विक्रीव्यवस्थेचा अभ्यास करणे

2. आदिवासी हस्तकलेचे जतन व संवर्धन व आदिवासी हस्तकला वृध्दींगत करण्यासाठी

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचा सहभाग अजमावणे

3. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत दरवर्षी भरविल्या जाणा-या प्रदर्शनांना आदिवासी हस्तकलाकारांचा प्रतिसाद व त्यांचा सहभाग यांचा शोध घेणे

4. हस्तकलेतून लघुउद्योग व स्वयंरोजगार निर्मिती होते काय ? किंवा होऊ शकेल काय ? याचा अभ्यास करणे.

5. आदिवासी हस्तकला सहकारी संस्था अस्तित्वात असल्यास त्याची व्याप्ती व मर्यादा याचा अभ्यास करणे.

6. आदिवासी हस्तकलेला सामाजिक प्रतिष्ठा मिळविण्यासाठी व ही परंपरागत कला अधिक प्रभावशाली बनविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

## प्रकरण ३ रे

## आदिवासी हस्तकलेला उत्तेजन देण्यासाठी राबविण्यात येणारे उपक्रम

आदिवासींनी खास त्यांच्या पध्दतीने तयार केलेल्या वस्तुंना त्यांच्या आदिम सौष्ठव, कलाकौशल्य व उत्कृष्ट हस्तकला यामुळे नागरी भागात भरपूर मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे. नागरीवस्ती व आदिवासी कारागीर यांची भेट होत नसल्यामुळे आदिवासींच्या हस्तव्यवसायात स्वयंरोजगाराची मोठी कुवत असूनही त्यांच्या वस्तुंना ग्राहक मिळत नसल्याने कारागिर व हस्तव्यवसायांचा संकोच होतो.

आदिवासी वस्तुंना बाजारपेठ मिळवून देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. या प्रयत्नांचा भाग म्हणूनच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था दरवर्षी आदिवासी हस्तकला प्रदर्शन आयोजित करीत असते. शासनातर्फे आदिवासी हस्तकला प्रदर्शन आयोजित करण्याकरिता रु.1,60,000/- (एक लाख साठ हजार फक्त) एवढी तरतूद करण्यात येते. या संस्थेव्यतिरिक्त अशाप्रकारचा कार्यक्रम अन्य कोणीही घेत नाही.

3.1 प्रदर्शनासाठी पुढील नियोजन केले जाते :-

आदिवासी हस्तकलेतील कलाकुसरीच्या व चांगल्या सौष्ठवाच्या वस्तु बनविणाऱ्या कारागिरांची माहिती प्रकल्प अधिकाऱ्यांकडून मागविण्यात येते. तसेच संस्थेकडे असलेल्या माहितीच्या आधारे प्रदर्शनासाठी हस्तकलाकारांची निवड केली जाते.

कुशल कारागिरांना दररोज रु.100/- इतके मानधन संस्थेकडून दिले जाते. (भोजन व निवासखर्च धरुन) त्याचबरोबर त्यांना वाटचालखर्च आणि जाण्या-येण्याचा प्रवासखर्च व त्यांनी बरोबर आणलेल्या वस्तुंचे एस.टी.अथवा रेल्वेचे लगेज या बाबींचा खर्च दिला जातो. सहायक कारागिरासा रु.25/- मानधन व इतर सवलती कुशल कारागिराप्रमाणेच देण्यात येतात.

कुशल कारागिर व सहायक कारागिर अशा दोघांना समाविष्ट करुन घेण्यात येते.

याखेरीज हस्तकला व्यवसायानुसार प्रदर्शनात स्टॉलची रचना करण्यात येऊन प्रदर्शनाची जागा व इतर सोयी कारागिरांस मोफत देण्यात येतात. निवड झालेल्या कारागिरांना प्रत्यक्ष प्रेक्षकांना आपल्या वस्तु विकण्याची परवानगी देण्यात येते. वस्तु तयार करण्याचे प्रात्यक्षिकही करुन दाखविण्याची परवानगी देण्यात येते. यासाठी कच्चामाल कारागिराने बरोबर आणणे आवश्यक आहे. त्यांनी विकलेलया वस्तुंची सर्व रक्कम कारागिरांचीच असते. विक्रीची पूर्ण रक्कम कारागिर आपल्याबरोबर परत जाताना घेऊन जातो. अशाप्रकारे संस्थेने यापूर्वी आयोजित

केलेल्या प्रदर्शनामध्ये अनेक कारागिरांना चांगला आर्थिक फायदा झालेला आहे.

दरवर्षी नवीन कारागिरांना संधी देण्याच्या उद्देशाने व त्यायोग आदिवासी हस्तकला व्यवसायांचा जास्तीत जास्त प्रचार व्हावा या उद्देशाने मागील प्रदर्शनात सहभागी झालेल्या कारागिरांबरोबरच नवीन कारागिरांनाही संधी देण्याचे संस्थेचे धोरण असते.

वरील हस्तकला प्रदर्शन कार्यक्रमांना वृत्तपत्र व अन्य प्रसिध्दी माध्यमातूनही प्रसिध्दी देण्यात येते.

आदिवासी हस्तकलांचा प्रचार व प्रसार याकरिता आणि त्या कलावस्तुंच्या विक्री व्यवस्थेसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांनी खास प्रयत्न करण्याचे त्यांनी त्यांच्या नाशिक येथील मुख्यालयात तसेच त्यांच्या प्रादेशिक कार्यालयातून आदिवासी हस्तकला वस्तु विक्रीसाठी व्यवस्था करण्याचे शासनाचे आदेश आहेत. याबाबत व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ, यांनी आवश्यक ती कार्यवाही करण्याची व जरुर वाटल्यास या कामात आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेची मदत घेण्याची व सहनिबंधक सहकारी संस्था यांचीही मदत घेण्याचे शासनाचे आदेश आहेत. {परिपत्रक क्र.संकीर्ण-1088/34360/633/प्र.क्र.207/का.6, दि.19 एप्रिल, 1990}

3.2 संस्थेमार्फत दि.22.11.1994 ते 29.11.94 या कालावधीत हस्तकला प्रदर्शनासाठी वस्तुंच्या विक्रीपासून आदिवासी हस्तकलाकारास मिळालेल्या उत्पन्नाची आकडेवारी पुढील तक्त्यात दर्शविण्यात आली आहे.

तक्ता क्र•3•1

11 वे आदिवासी हस्तकला प्रदर्शन सी•एम•शहा हॉल इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनिअर्स शिवाजीनगर, पुणे
दिनांक 22 ते 29•11•1994 पर्यंत झालेल्या विक्रीचा तपशील• (रुपयांत)

| •1• | •2• | •3• | •4• | | | | | | | | •5• | •6• |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ• क्र• | हस्तकला प्रकार | कलाकाराचे नांव | मंगळ 22 | बुध 23 | गुरु 24 | शुक्र 25 | शनि 26 | रवि 27 | सोम 28 | मंगळ 29 | एकूण विक्री | टक्केवारी |
| 1• | वनौषधी | जनसेवा दत्ताश्रम | 1928 | 2445 | 4514 | 2425 | 3260 | 2900 | 3465 | 5075 | 26004 | 9•11 |
| 2• | बांबूकाम | अप्रुप निर्माण | 1577 | 1510 | 3610 | 1380 | 606 | 425 | 1585 | 307 | 11000 | 3•85 |
| 3• | नागली पदार्थ | जव्हार तालुका आदिवासी भोगिनी | 1045 | 2005 | 2980 | 2025 | 2490 | 1000 | 250 | 1275 | 13070 | 4•57 |
| 4• | वारली पेंटिंग | मधुकर वाडू | 1350 | 1250 | 1100 | 500 | 300 | 500 | 1000 | 1000 | 8000 | 2•80 |
| 5• | वारली पेंटिंग | नथु सुतार | 1190 | 950 | 1525 | 600 | 1000 | 1500 | 700 | 1150 | 8615 | 3•01 |
| 6• | वारली पेंटिंग | कृष्णा पसारे | 1000 | 600 | 1550 | 500 | 800 | 1000 | 700 | 900 | 7050 | 2•46 |
| 7• | वारली पेंटिंग | देवू रामा धोंपडे | 1050 | 500 | 1000 | 750 | 900 | 600 | 1100 | 1000 | 7900 | 2•76 |
| 8• | वाळाच्या वस्तु | विमल शेळके | 597 | 850 | 527 | 8020 | 1715 | 713 | 704 | 1900 | 15026 | 5•26 |
| 9• | बांबूकाम | काशिनाथ आंबेकर | 1500 | 1560 | 700 | 950 | 1000 | 3016 | 1500 | 950 | 11176 | 3•91 |
| 10• | बांबूकाम | कासू वाघमारे | 3620 | 1212 | 5492 | 888 | 1175 | 132 | 346 | 250 | 13115 | 4•59 |
| 11• | बांबूकाम | चंदर साबळे | 814 | 681 | 946 | 812 | 633 | 865 | 551 | 891 | 6193 | 2•16 |
| 12• | बांबूकाम | गुरुकू गोटा | 400 | 500 | 300 | 600 | 750 | 550 | 500 | 400 | 4000 | 1•40 |
| 13• | वेतकाम | शिवराम वंगारे | 7050 | 1000 | 3160 | 1377 | 4270 | 4000 | 2500 | 2000 | 25357 | 8•88 |
| 14• | टिकाऊ खाद्यपदार्थ | नारायण निरगुडा | 582 | 676 | 773 | 602 | 1630 | 1036 | 1500 | 1200 | 7999 | 2•80 |
| 15• | बांबूकाम | धात्रजो भोमाळे | 450 | 459 | 530 | 770 | 895 | 1300 | 560 | 469 | 5433 | 1•90 |
| 16• | लाकडाचे मुखवटे | कृष्णा राऊत | 1035 | 925 | 955 | 1235 | 1255 | 900 | 560 | 1048 | 7900 | 2•76 |
| | | | | | | | | | | | 169938 | |

| ·1· | ·2· | ·3· | ·4· | | | | | | | | ·5· | ·6· |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ· क्र· | हस्तकला प्रकार | कलाकाराचे नांव | मंगळ 22 | बुध 23 | गुरु 24 | शुक्र 25 | शनि 26 | रवि 27 | सोम 28 | मंगळ 29 | एकूण विक्री | टक्केवारी |
| 17· | लगयाचे मुखवटे | श्रावण गावीत | 535 | 990 | 470 | 730 | 850 | 635 | 521 | 487 | 5218 | 1·82 |
| 18· | बांबूकाम | कुशाबा लेंभे | 510 | 579 | 425 | 385 | 466 | 611 | 950 | 295 | 4221 | 1·47 |
| 19· | बांबूकाम | म्हतारबा झांजरे | 450 | 400 | 300 | 650 | 700 | 650 | 511 | 250 | 3911 | 1·37 |
| 20· | देवांचे मुखवटे | रामचंद्र जाधव | 992 | 618 | 743 | 789 | 960 | 743 | 302 | 1000 | 6147 | 2·15 |
| 21· | लगयाचे मुखवटे | सुदाम भोये | 940 | 800 | 830 | 900 | 890 | 987 | 647 | 965 | 6959 | 2·43 |
| 22· | लाकडी कोरीव काम | धर्मा कडू | 550 | 690 | 580 | 534 | 683 | 600 | 653 | 700 | 4998 | 1·74 |
| 23· | काष्ट शिल्पे | अशोक सुरुशे | 300 | 450 | 1900 | 3759 | 600 | 9000 | 400 | 3000 | 16025 | 5·60 |
| 24· | अनुमत्रिक प्रशिक्षण | अनुमत्रिक प्रशिक्षण केंद्र | 6250 | 5575 | 3000 | 4305 | 950 | 5500 | 6000 | 6500 | 38080 | 13·34 |
| 25· | लाकडी इतर वस्तु | मनोहर उईके | 955 | 1015 | 3025 | 1069 | 3550 | 4000 | 1000 | 1440 | 15054 | 5·20 |
| 26· | दगडी शिल्पे | पुनमचंद मारगाये | 300 | 490 | 965 | 1500 | 4490 | 1340 | 2000 | 1900 | 12985 | 4·54 |
| 27· | बांबूकाम | महेश दामू पारधी | 357 | 330 | 280 | 400 | 471 | 70 | 787 | 615 | 4010 | 1·40 |
| | | | | | | | | | | | 115500 | 100 टक्के |

1• उपरोक्त तक्त्यावरुन आदिवासी हस्तकलाकारांना 8 दिवसांच्या कालावधीत एकूण मिळालेल्या उत्पन्नापैकी रु•38,080/- {13•34 टक्के} एवढे सर्वाधिक उत्पन्न अनुभवी प्रशिक्षण केंद्र, रायगड या संस्थेस वस्तुंच्या विक्रीतून मिळाले•

त्याखालोखाल जनसेवा दत्ताश्रम, या ट्रस्ट संस्थेस "वनौषधी" या विक्रीतून रु•26,004/- {9•1 टक्के} इतके उत्पन्न मिळाले•

वेतकाम करणा-या रायगडच्या "अॅकेडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स" या संस्थेस रु•25,357/- {8•88 टक्के} इतकी आर्थिक प्राप्ती झाली• उपरोक्त तक्त्यावरुन संस्थामार्फत विक्रीस ठेवण्यात आलेल्या वस्तुंची विक्रमी विक्री झाली• "काष्ठशिल्प" या वैयक्तिक हस्तकला प्रकारास एकूण उत्पन्नापैकी 7 दिवसांच्या कालावधीत रु•16,005/- {5•60 टक्के} एवढे उत्पन्न मिळाले•

थोडक्यात अल्पकालावधीत हस्तकलाकारांना कमीत कमी रु•4,000/- पासून रु•38,080/- इतके जास्तीत जास्त उत्पन्न प्राप्त झाले व सर्व हस्तकलाकृतींना एकूण रु•2,85,438/- एवढे एकूण उत्पन्न मिळाले• वरील तक्त्यावरुन आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या पुढाकाराने आदिवासींची दुर्मिळ हस्तकलाकृती शहरातील जनतेपर्यंत पोहोचली• तसेच या प्रदर्शनाद्वारे सात हस्तकलाकारांना पुण्यातील "इंटेरिअर डिझाइनर" यांचेकडून मोठया प्रमाणावर पुरवठयाची मागणी मिळाली•

3•3 संस्थेने 1994-95 यावर्षी भरविलेल्या प्रदर्शनासाठी खालीलप्रमाणे खर्च झाला•

| अ•क्र• | बाब | खर्च रुपये | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1• | हॉलचे भाडे | 9,000=00 | 8 |
| 2• | कलाकारांचे मानधन | 33,075=00 | 29 |
| 3• | वाटचाल खर्च | 1,360=00 | 1 |
| 4• | प्रवासखर्च | 9,954=00 | 9 |
| 5• | वस्तु वाहतूक खर्च | 6,189=50 | 5 |
| 6• | निवासस्थान भाडे | 1,870=00 | 2 |
| 7• | कलाकारांसाठी चादरी, गाद्या व उशा | 2,700=00 | 2 |
| 8• | भोजनभत्ता | 17,280=00 | 15 |
| 9• | इतर किरकोळ खर्च | 3,221=75 | 3 |

| अ•क्र• | बाब | खर्च रुपये | टक्केवारी |
| --- | --- | --- | --- |
| 10• | के•आर•मांडववाले | 25,765=00 | 23 |
| 11• | इतर खर्च | 3,154=25 | 3 |
| | एकूण खर्च | 1,13,570=00 | 100 |

1• उपरोक्त तक्त्यावरुन हस्तकलाकारांचे मानधन यासाठी सर्वाधिक 29 टक्के खर्च होत असल्याचे दिसते• प्रदर्शन कालावधीत कुशल हस्तकलाकारास रु•100/- व अकुशल हस्तकलाकारास रु•25/- मानधन देण्यात येते•

2• त्यानंतर स्टॉल उभारणे व हॉलच्या विक्रीच्या अंतर्गत मांडणीसाठी 23 टक्के रक्कम खर्च झाल्याचे दिसते• यात प्रत्येक हस्तकलाकार वस्तु विक्रीसाठी स्वतंत्र व्यवस्था §स्टॉल§ करण्यात येते•

3• प्रदर्शन कालावधीत हस्तकलाकारांना भोजन व निवासव्यवस्था संस्थेमार्फत पुरविण्यात आली होती व या खर्चापोटी अनुक्रमे रु•17,280/- §15 टक्के § व रु•1,870/- §2 टक्के§ एवढा खर्च आला• या व्यतिरिक्त हस्तकलाकारस प्रवासखर्च, वाटचाल खर्चही देण्यात येतो• तसेच संस्थेस या प्रदर्शनाच्या व्यवस्थापनासाठीही खर्च करावा लागतो• या सर्वांचा खर्च एकत्रित केल्यास संस्थेस या वर्षीच्या हस्तकला प्रदर्शनासाठी रु•1,13,570/- एवढा खर्च आला•

3•4 पुण्यातील आदिवासी हस्तकलाप्रेमींनी आदिवासी हस्तकलेसंदर्भात दिलेले काही निवडक "अभिप्राय" पुढीलप्रमाणे आहेत•

1• आज आदिवासी हस्तकला प्रदर्शनास भेट दिली• उपेक्षित लोकांची कला नागरी भागातील लोकांना पहावयास मिळाली• कसलेही ट्रेनिंग नसताना उपजत गुणांचे आधारावर कित्येक आकर्षक वस्तु आदिवासी तयार करतात, हे पाहून त्यांचे कौतुक करावे, तितके थोडे आहे• शासनाकडून आणखी जादा प्रोत्साहनाची अपेक्षा•

श्री•मोरे, न्यायाधीश, पुणे

2• प्रदर्शनातील वस्तु आदिवासी लोकांनी बनविल्या आहेत, यावर विश्वास बसत नव्हता. इतक्या सुंदर वस्तु बनविल्या आहेत. आपण त्या सर्वांना एकत्र आणले व उन्नतीचा प्रयत्न केला याबद्दल धन्यवाद

सौ• उर्मिला दंडे, पुणे

3• आदिवासी हस्तकला प्रदर्शन पाहून आदिवासी किती कलाप्रेमी आहेत, हे शहरातील लोकांना कळले. त्यांच्यातील कला शहरी लोकांना संपादन करता येईल. याचप्रकारे आदिवासी हस्तकला प्रदर्शन भरवून त्यांना प्रोत्साहन दिले तर त्यांना त्यांच्या कलेबद्दल आत्मविश्वास वाढेल व तेही चांगले आयुष्य जगण्याचा प्रयत्न करु शकतील. धन्यवाद.

एक नागरिक

4• 26•11•94 - आदिवासी प्रदर्शन म्हणून पाहण्यास आलो. वस्तु खूप सुंदर व टिकाऊ वाटल्या. आमच्याबरोबर आलेल्या आश्रमीय 35 विद्यार्थ्यांनी प्रदर्शन खूप आवडले. त्यांना अशा गोष्टी शिकण्याशा वाटल्या. यातच प्रदर्शनाचा हेतू साध्य झाला असे वाटते.

सौ• सरिता हसबनीस
सौ• विजया देव
आहिम संस्थेची बांदोडकर प्रा• शाळा

5• आदिवासी हस्तकला प्रदर्शन खूपच सुंदर वाटले. अशाचप्रकारे त्यांच्या कलेस वाव मिळावा. या आदिवासी कलेची ग्रामीण जीवनापासून दूर जात असलेल्या समाजास माहिती व्हावी. हा उदात्त हेतू साध्य व्हावा व आदिवासींच्या जीवनात एक चांगली पहाट यावी याच सदिच्छा व शुभेच्छा.

धीरज पवार, आतार इ•
इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्चर टेक्नॉ• पुणे

6. दि.29.11.94 - आदिवासी हस्तकलेतून त्यांच्या संस्कृतीचे दर्शन घडते. आदिवासी हस्तकलेस प्रोत्साहन मिळाले पाहिजे. यासाठी शासनाने अनुदान देऊन कंझुमर्स स्टोअर्स व ग्राहकपेठ अथवा जिल्हा कंझमुर्स स्टोअर्समध्ये आदिवासींचा माल प्राधान्याने ठेवणेबाबत संबंधितांना सूचना देणे आवश्यक आहे. आदिवासी उद्योगाला चालना मिळण्यासाठी शासनाने आदिवासी ग्रामोद्योग हस्तकला उद्योग योजना राबवून प्रत्येक डी.पी.डी.सी.ने व संबंधित खात्याने तशी तरतूद केली पाहिजे. आदिवासी सहकारी संस्थांना आदिवासींचा माल खरेदी करण्यासाठी प्रोत्साहन देऊन आदिवासी विकास महामंडळ व ट्रायफेडने त्याला परदेशी बाजारपेठ उपलब्ध करून देण्याची गरज आहे. त्यासाठी याबाबतचा अभ्यास व सर्व्हेचे काम आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने तातडीने हातात घेऊन आदिवासी आयुक्त व सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी प्रयत्न केले पाहिजेत. कारण आदिवासींनी तयार केलेल्या मालाला ग्राहक व बाजारपेठ फार महत्वाची आहे. वर्षातून एकदा हे प्रदर्शन भरवून ह्या कामाला हातभार लावण्याबद्दल संशोधन संस्थेचे आभार मानले पाहिजेत.

एक नागरिक

## प्रकरण 4

### वैयक्तिक लाभार्थी प्रकरणांचा अभ्यास

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत पुणे येथे भरविण्यात आलेल्या 11 व्या आदिवासी कलाकृती प्रदर्शनातील काही वैयक्तिक हस्तकलाकारांच्या व काही संस्थांच्या कलाकृतींच्या वैयक्तिक प्रकरणांच्या अभ्यासासाठी खालील प्रमुख उद्दिष्टये ठरविण्यात आली•

1• सध्या अस्तित्वात असलेल्या हस्तकलेचा व त्याद्वारे निर्मित/उत्पादित शिल्पांचा अभ्यास करणे•

2• हस्तकलाकृतीतून मिळालेल्या उत्पन्नाद्वारे त्यांच्या कुटुंबाची/संस्थेची आर्थिक स्थिती तपासणे•

3• आदिवासी हस्तकलाकृती, निर्मिती संस्था व व्यक्तीगत हस्तकलाकार यांना शासनाने दिलेल्या आर्थिक मदतीचा अथवा प्रोत्साहनाच्या परिणामाची स्थिती तपासणे•

4• त्यांना हस्तकलाकृती निर्मितीमध्ये येत असलेल्या अडचणींचा अभ्यास करणे•

5• हस्तकला प्रशिक्षणाबाबत कलाकारांचे मत अजमावणे•

6• संस्थेमार्फत भरविलेल्या 11 व्या प्रदर्शनातून आर्थिक प्राप्ती झाली किंवा कसे याचा शोध घेणे- नसल्यास त्यामागील कारणांचा मागोवा घेणे•

7• हस्तकलाकृतींना ग्राहकांचा खरेदीचा प्रतिसाद अजमावणे•

8• ह्याच कलाकृतीपासून कलाकारांचे उत्पन्न वाढविण्याच्या विविध मार्गांचा शोध घेणे•

### प्रकरण (1)

4•1 ठाणे जिल्ह्यातील पालघर तालुक्यातील कोंढाण, पो•मनोर येथील वारली जमातीच्या कलाकारांचे शिक्षण इ•10 वी पर्यंत झाले आहे•

त्यांच्या मालकीची एकूण 1:5 एकर जमीन असून शेतीपासून मिळणारे त्यांचे उत्पन्न रु•3,000/- इतके आहे• उत्पन्नानुसार त्यांचा समावेश दारिद्रय रेषेखालील गटात होतो• "वारली चित्रकला" ही त्यांची हस्तकलाकृती आहे• या हस्तकलाकृतीपासून त्यांना रु•10,000/- एवढे वार्षिक उत्पन्न मिळते•

सदर हस्तकलाकारास हो कलाकृतो निर्माण करण्यास रु•30/- प्रति•मोटरचे कापड विकत घ्यावे लागते व त्या कापडास रंग देऊन त्यावर वेगवेगळ्या रंगाच्या ऑईलपेंटने चित्रकला रेखाटावो लागते• यामध्ये पोस्टर्स, ग्रिटींग कार्डस यांचा समावेश होतो• हस्तकलाकारांचो हो कलाकृतो व्यक्तोगत असून कालाकाराने या कलेस व्यावसायिक स्वरुप दिले आहे•

सदर हस्तकलाकाराने या व्यवसायाचे प्रशिक्षण घेतले नाहो• कारण वारलो चित्रकला हा त्यांचा परंपरागत व्यवसाय आहे• तथापि हा कायमस्वरुपो व्यवसाय आहे• वारंवार कलाकृतो निर्मितो होत असल्याने आता हा कलाकार प्रशिक्षित झाला आहे व तो अन्य वारलो विद्यार्थ्यांना या चित्रकलेचे प्रशिक्षण देतो•§शिकवतो§

या चित्रकलाकारास बँक अथवा शासनाकडून कर्ज अथवा अनुदान उपलब्ध झाले नाहो• सबब हस्तकलाकाराने या व्यवसायचे भांडवल स्वतःच उभे केले• या हस्तकलाकाराने तयार केलेल्या वस्तु आदिवासो संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत भरविल्या जाणा-या प्रदर्शनात विक्रोस आणून ठेवल्या• या प्रदर्शनाद्वारे हस्तकलाकारास 8 दिवसात रु•8,000/- इतके उत्पन्न मिळाले• वर्षभरात मिळणा-या उत्पन्नापेक्षा 8 दिवसातोल हे उत्पन्न वाढल्याचे लाभार्थीने सांगितले• हस्तकलाकारांच्या घरो येऊन काहो परदेशो नागरिक मागणो नोंदवून खरेदो करतात• परदेशातहो मोठयाप्रमाणात ग्रिटींग कार्डस, पोस्टाद्वारे पुरविलो जातात• अशाप्रकारे कारागिरांच्या कलावस्तुंना मोठो मागणो आहे व त्यानुसार विक्रो व्यवस्था होते• हस्तकलाकारांच्या वस्तुना/चित्रांना कायमस्वरुपो बाजारपेठ उपलब्ध आहे•

वारलो चित्रकला या कलाकाराचा मुख्य व्यवसाय बनला आहे व यात तो यशस्वो झाला आहे•

## प्रकरण §2§

---------

4•2 पुणे जिल्हयातोल खेड तालुक्यातोल वरचो भोमाळो येथोल महादेव कोळो जमातोचा हा कलाकार असून शिक्षण 3 रो पर्यंत झाले आहे• त्यांच्या मालकोचो एकूण 10 एकर कोरडवाहू जमोन आहे• शेतोपासून रु•3200/- एवढे वार्षिक उत्पन्न मिळते• उत्पन्नानुसार लाभार्थ्यांचा समावेश दारिद्रय रेषेखालोल गटात होतो• "बांबूकाम" हो त्याचो हस्तकलाकृतो आहे• या हस्तकलाकृतोपासून रु•3200/- एवढे वार्षिक उत्पन मिळते•

हस्तकलाकारांना वस्तु निर्मितोसाठो लागणारा कच्चामाल बाहेरुन विकत घ्यावा लागतो व त्यातून बांबूच्या करंडया, बास्केट, टोपल्या या वस्तुचो निर्मितो केलो जाते• हस्तकलाकाराचो हो कलाकृतो व्यक्तोगत असून कलाकाराने या कलेस दुय्यम व्यवसाय म्हणून स्थान दिले आहे•

हस्तकलाकाराने या व्यवसायाचे प्रशिक्षण घेतले नाही• परंतू हा त्यांचा परंपरागत व्यवसाय असून गेली 18 वर्षे बांबूकाम करीत आहे• त्यामुळे प्रशिक्षित झाला आहे•

लाभार्थ्यास आतापर्यंत बँक अथवा शासकीय मदत उपलब्ध झाली नाही• 1994-95 यावर्षी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत पुणे येथे आयोजित केलेल्या प्रदर्शनात सहभाग घ्यायचा असल्याने भांडवल उभारणीसाठी प्रकल्प अधिकारी कार्यालय, घोडेगांव यांचेकडून रु•2,000/- मदत मिळाली• प्रदर्शनात या कारागिरास रु•5,433/- आर्थिक प्राप्ती झाली• एरवी हस्तकलाकाराने तयार केलेल्या वस्तु आठवडे बाजारात अथवा घरच्या घरी विकल्या जातात• याशिवाय अन्य विक्री व्यवस्था नाही• संस्थेने भरविलेल्या प्रदर्शनात कलाकाराचा या वर्षी प्रथमच सहभाग होता• हस्तकलाकाराने बांबूकाम केलेल्या विविध वस्तु विक्रीसाठी आणल्या होत्या• तथापि, वस्तुंना रंगकाम केल्याने शहरातील ग्राहकांच्या पसंतीस उतरल्या नाहीत• पर्यायाने अपेक्षेइतकी वस्तुंची विक्री झाली नाही• खर्च झालेल्या कच्चा मालापेक्षा निम्म्या किंमतीत वस्तु विकून भांडवल मोकळे केले• वस्तुतः प्रदर्शनात मांडण्यासाठी अत्यंत सुबक व टिकाऊ वस्तु तयार करण्यात आल्या होत्या• याच वस्तु गांवाकडे विकल्या असत्या तर दुप्पट फायदा झाला असता असे लाभधारकाने मत दिले• शहरातील ग्राहकांची पसंती लक्षात घेऊन वस्तुमध्ये काही बदल करुन पुनःश्च संस्थेमार्फत भरविल्या जाणाऱ्या प्रदर्शनांना सहभागी होण्याची इच्छा लाभधारकाने प्रदर्शित केली• तसेच वस्तुंच्या विक्रीसाठी परवाना मिळण्याची अपेक्षा प्रदर्शित केली• त्यांच्या वस्तु अधिक कलात्मक व्हाव्यात, यासाठी प्रशिक्षण मिळावे, असेही लाभधारकाने सांगितले•

## प्रकरण ❨3❩

---------

4•3 नाशिक जिल्हयातील पेठ तालुक्यातील मुरंब गांवचे सदर कलाकार कोकणा जमातीचे असून इ•4 थीपर्यंत त्यांचे शिक्षण झालेले आहे• त्यांच्या मालकीची एकूण 2•5 एकर शेती असून शेतीपासून रु•3,000/- इतके वार्षिक उत्पन्न मिळते• उत्पन्नानुसार लाभार्थ्यांचा समावेश दारिद्रय रेषेखालील गटात होतो• "लाकडी मुखवटे" ही कारागिरांची हस्तकलाकृती आहे• या हस्तकलाकृतीपासून लाभार्थ्यास रु•3,000/- एवढे वार्षिक उत्पन्न मिळते•

सदर हस्तकलाकार विशिष्ट प्रकारच्या लाकडापासून लाकडी मुखवटे तयार करुन विक्री करतो• यासाठी लागणारा कच्चामाल/लाकूड जंगलातून आणावे लागते व त्यासाठी वन विभागाची परवानगी घ्यावी लागते• अन्यथा पकडले जाण्याची भिती असते• हस्तकलाकाराची ही कलाकृती व्यक्तीगत असून पारंपारिक आहे, यासाठी प्रशिक्षण घेतलेले नाही•

लाभार्थ्यास अद्यापपर्यंत बँक अथवा शासनाची आर्थिक मदत झालेली नाही• हस्तकलाकृतीसाठी लागणारे भागभांडवल रु•1,000/- कलाकाराने सावकाराकडून उभे केले• सावकाराची वसूली झाली की सावकर परत कर्ज देतो• कलाकृती तयार केल्यानंतर विक्रीची व्यवस्था आदिवासी

संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेमार्फत भरविण्यात येणाऱ्या प्रदर्शनामधून होते• यावर्षी या प्रदर्शनात लाकडी मुखवटे विकून रु•7,400/- एवढे उत्पन्न मिळाले• या व्यतिरिक्त विक्रीची अन्य व्यवस्था नाही• प्रदर्शनातील वस्तुंच्या विक्रीला उत्कृष्ट प्रतिसाद आहे• या प्रदर्शनात कलाकरांचा नियमित सहभाग असतो• तथापि, त्यांचा हा व्यवसाय प्रदर्शनामध्ये वस्तु ठेवण्याइतपत मर्यादित आहे• वस्तु तयार करण्यासाठी कारागिरांची दोन मुले शाळेतून आल्यावर किरकोळ कामाची मदत करतात•

सदर कारागिराने स्वतः प्रशिक्षण घेतले नसले तरी कोणत्याही प्रकारची फी अथवा मानधन न घेता इतरांना शिकविले आहे व मार्गदर्शनही केले आहे•

वस्तु विक्रीसाठी परवाना मिळावयास हवा म्हणजे रस्त्यांवर वस्तु विक्रीस ठेवता येतील व जकात घेतली जाणार नाही• तसेच शासनाकडून विक्री व्यवस्थेसाठी बाजारपेठ उपलब्ध व्हावी, असे या कारागिरांना वाटते•

विक्रीची व्यवस्था नसल्याने दुय्यम व्यवसाय म्हणून हा व्यवसाय स्विकारता येत नाही, असेही लाभार्थींनी सांगितले•

## प्रकरण §4§

4•4 भंडारा जिल्हयातील सालेकसा तालुक्यातील मुरुंबे गांवचा हा हस्तकलाकार "हलबी" जमातीचा असून त्याचे शिक्षण एस•एस•सी•पर्यंत झाले आहे• शेती हा मुख्य व्यवसाय असून त्यापासून रु•3,000/- ते रु•4,000/- वार्षिक उत्पन्न मिळते• उत्पन्नानुसार त्यांचा समावेश दारिद्रय रेषेखालील गटात झालेला आहे• याशिवाय "दगडशिल्पे" ही हस्तकलाकृती निर्मिती हा त्यांचा दुय्यम व्यवसाय आहे• त्यापासून या कलाकारास रु•400/- ते 500/- इतके वार्षिक उत्पन्न मिळते•

सदर हस्तकलाकार विशिष्ट प्रकारच्या दगडापासून व पितळ या धातूपासून वेगवेगळे आकार देऊन मूर्ती तथा वस्तु तयार करतो• दगडी शिल्प तयार करण्यासाठी लागणारा विशिष्ट प्रकारचा दगड जयपूर, जबलपूर व जगदलपूर येथून विकत आणावा लागतो व पितळ विकत घ्यावे लागते• सदर हस्तकलाकाराची ही व्यक्तीगत हस्तकला असली तरी त्यास व्यावसायिक स्वरुप दिले आहे• कारागिराचा हा परंपरागत व्यवसाय असला तरी या कारागिराने साऊथ सेंट्रल झोन, नागपूर कडून प्रशिक्षण घेतले आहे• प्रशिक्षण घेतल्यामुळे त्याची कलाकृती अधिक दर्जेदार होत आहे•

हा व्यवसाय सुरु करण्यासाठी लाभधारकास बँक अथवा शासनाची आर्थिक मदत झाली नाही• भांडवल घरच्या घरीच उभे केले• तयार होणारी दगडी शिल्पे व पितळी काम यांना घरच्या

घरोच खूप ऑर्डर्स येतात व घरच्या घरो ऑर्डर्स पूर्ण केल्या जातात• याद्वारे त्यांच्या कलाकृतोचो विक्री होते• याशिवाय आदिवासो संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत भरविण्यात येणाऱ्या प्रदर्शनातहो सहभाग असतो• वरोल दोन्हो प्रकारच्या विक्री व्यवस्थेला उत्कृष्ट प्रतिसाद मिळत असल्याचे कलाकाराने सांगितले• यावर्षो भरलेल्या प्रदर्शनात लाभार्थ्यास रु•12,985/- आर्थिक प्राप्तो झालो• हस्तकलाकारांच्या या कामामध्ये त्याचे कुटुंब (पत्नो) त्यांना मदत करते• याशिवाय बाहेरुन 15 रु• रोजंदारोवर कायमस्वरुपो एक कारागोर घेतला आहे• हा कलाशिल्पे तयार करण्यासाठो स्वतंत्र जागेचो व्यवस्था आहे•

सदर कारागिराने कच्चामाल व ग्रेंडर मशोन घेण्यासाठो तरो किमान पैसे मिळावेत, अशो आशा व्यक्त केलो• जिल्हा उद्योग केंद्र यांचेकडे 5 महिन्यापूर्वो कर्ज प्रकरण केले आहे• त्यांना अद्याप पैसे मिळाले नाहोत• या व्यवसायात कायमस्वरुपो उत्पन्न मिळत असल्याने लाभधारकाने व्यवसाय वाढविता येईल, असे सांगितले• तथापि, शासनाच्या मदतोचो अपेक्षा आहे•

## प्रकरण (5)

4•5 नाशिक जिल्हयातोल सुरगाणा तालुक्यातोल पांगारणे गांवचा हा हस्तकलाकार "वारलो" जमातोचा असून त्याचे शिक्षण इ•5 वोपर्यंत झालेले आहे• शेतो हा त्याचा मुख्य व्यवसाय असून त्यापासून रु•4,000/- इतके वार्षिक उत्पन्न मिळते• उत्पन्नानुसार त्यांचा समावेश दारिद्रय रेषेखालोल गटात होतो• शेतमजूरो हा त्यांच्या कुटुंबांचा दुय्यम व्यवसाय आहे• याशिवाय बांबूपासून हस्तकलाकृतो निर्मितो हा या कलाकाराचा दुय्यम व्यवसाय आहे• या कलाकृतोपासून लाभधारकास अंदाजे वार्षिक रु•10,000/- उत्पन्न मिळते•

सदर हस्तकलाकार बांबूपासून टोपल्या व शोभोवंत वस्तु तयार करतो• यासाठो लागणारा कच्चामाल जंगलातून उपलब्ध होतो• सदर हस्तकलाकाराचो हो कलाकृतो व्यक्तोगत आहे•

हस्तकलाकाराचा हा परंपरागत व्यवसाय आहे• तथापि, कलाकाराने "वनवासो कलयाण आश्रम, गुहो" येथून प्रशिक्षण घेतले आहे• या संस्थेमार्फत कलाकारास संस्थेच्या खर्चाने बेंगलोरला पाठविले होते•

कलाकाराने प्रकल्प अधिकारो, कळवण यांचेकडे वारंवार आर्थिक मदतोसाठो याचना केलो, तथापि त्यांना मदत मिळालो नाहो• उलट एकावेळो प्रकल्प अधिकारो कार्यालयापर्यंत पोहचण्यास रु•100/- खर्च होतात• लाभधारकाचे रु•400/- अशाप्रकारे प्रवासखर्चात गेले• भांडवलाअभावो लाभधारकास कमो प्रमाणात वस्तु आणाव्या लागल्या, असे कारागिराने सांगितले•

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत भरविल्या जाणा-या प्रदर्शनामधूनच वस्तुंची विक्री होते• मागील सात वर्षापासून ते संस्थेमार्फत भरविल्या जाणा-या प्रदर्शनामध्ये नियमित सहभागी होतात, त्यामुळे हा व्यवसाय दुय्यम व्यवसाय म्हणून स्विकारला आहे• हस्तकलाकारांची प्रमुख अडचण म्हणजे त्यांना हस्तकलाव्यवसाय वृध्दींगत करण्यासाठी आर्थिक भांडवलाची गरज आहे• रु•5,000/-पर्यंत कर्जे मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली• तसेच त्यांच्या उत्पादित मालास/कलाकृतीस कायमस्वरुपाची बाजारपेठ मिळावी• विक्रीची व्यवस्था झाल्यास पूर्ण वेळ व्यवसाय स्विकारता येईल•

## प्रकरण §6§

---------

4•6 नागपूर येथील ही "अप्रूप निर्माण" नावाची संस्था आहे• ही संस्था नागपूर, यवतमाळ, भंडारा जिल्हयामध्ये काम करते• एका आर्किटेक्चरने दोन सहायकांना एकत्रित करुन हे काम हाती घेतले आहे•

संस्थेमार्फत पायलट प्रोजेक्ट हाती घेतले जातात• नागपूर, यवतमाळ, भंडारा या जिल्हयातील आदिवासींना बांबूपासून हस्तकला निर्मितीचे 3 महिन्यांचे प्रशिक्षण दिले जाते• प्रशिक्षण काळात रु•600 ते रु•700 किंवा रु•30/- प्रमाणे 7 ते 8 महिने रोजगार उपलब्ध करुन द्यायचा• अशा प्रशिक्षित आदिवासींना प्रोजेक्ट देऊन ते उत्पादन मार्केटमध्ये विक्री लेव्हलला आणावयाचे व नंतर आदिवासींची 16 सभासदांची सहकारी संस्था स्थापन करायची व त्यांचे उत्पादन मार्केटींग करुन घ्यायचे• असे प्रकल्प आदिलाबाद, यवतमाळ येथे पूर्ण केले• संगमसावनजी व गंगाझरीचे प्रकल्प पूर्ण व्हायला आले आहेत• याशिवाय उत्पादित झालेल्या वस्तु दुकानात विक्रीस ठेवतात• उत्पादित वस्तु या नाविण्यपूर्ण असल्याने विक्रीस उत्कृष्ट प्रतिसाद मिळतो• या मुव्हमेंट संस्थेला "कपार्ट" कडून आर्थिक मदत उपलब्ध झाली आहे• उत्पादित वस्तु प्रत्येकला स्वतंत्रपणे घरी तयार करायला देतात• त्यामुळे उत्पादित माल तयार करण्यासाठी स्वतंत्र वर्कशॉप अथवा स्वतंत्र जागा नाही•

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत भरविण्यात आलेल्या 11 व्या प्रदर्शनास यावर्षी मुव्हमेंट चळवळीचा प्रथम सहभाग होता• त्यांना या प्रदर्शनात वस्तु विक्रीस चांगला प्रतिसाद मिळाला• रु•11,000/- एवढे आर्थिक प्राप्ती झाली•

संस्थेच्या प्रतिनिधींशी बोलताना स्थानिक लेव्हलवर बेत निर्माण व्हावा, विक्रीच्या मार्केटींगच्या दृष्टीने शासनाकडून विशेष प्रयत्न व्हावेत, सरकारने वेणू म्युझियम उभारण्यासाठी प्रयत्न करावेत• गांवस्तरावरील सरकारच्या पडीक जमिनी बांबू प्लँटेशनसाठी उपलब्ध करुन द्याव्यात अशा सूचनांची व योजनांची शासनाकडून अंमलबजावणी व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे•

## प्रकरण (7)

---

4.7 ठाणे जिल्हयातील जव्हार तालुक्यातील मु.पो.जामसर येथील "जव्हार तालुका आदिवासी भगिनी औद्योगिक उत्पादक संस्था, मर्या. महिला सहकारी संस्था नोंदणीकृत संस्था आहे.

या संस्थेमध्ये 8 गांवातील 25 वर्षे वयाच्या पुढील 265 महिला सभासद आहेत. या सर्व महिला अशिक्षित असून वारली, कोकणा, ठाकूर, महादेव कोळी व कातकरी या जमातीच्या आहेत. या संस्थेतील 60 महिलांना शिवणकामाचे प्रशिक्षण देऊन 50 टक्के अनुदानावर शिलाईमशिन पुरविण्यात आल्या आहेत. अंगणवाडी विद्यार्थ्यांचे, जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्याचे, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या गणवेषाचे टेंडर या संस्थेस मिळते व शिलाई मशिन पुरविलेल्या महिला सभासदाकडून गणवेष शिलाईचे काम करुन घेतले जाते. याशिवाय उर्वरित महिलांकडून त्यांच्याच शेतात पिकणारे नागली, वरई अशा स्वरुपाचे धान्य खरेदी केले जाते व सभासदाकडून या धान्यावर प्रक्रिया करण्यात येऊन ते विक्रीसाठी तयार केले जाते. लोणची, पापड, चटण्या, सुपारी, सत्व, मसाला, डाळी इ.घरामध्ये वापरात येणा-या वस्तु महिलांकडून तयार करुन घेतल्या जातात. या माध्यमातून महिलांना रु.20/- रोज अथवा रु.600/- द.म.उपलब्ध होतात. सर्व महिला कुशल कामगार आहेत. सुरवातीस संस्थेतील महिला सभासदांकडून 11/-रु. सभासद फी घेण्यात आली. याद्वारे रु.2600/- भाग भांडवल उपलब्ध झाले.

संस्थेस आर्थिक सहाय्य :- खादी ग्रामोद्योग मंडळाकडून खेळते भांडवल व मसाला युनिट शेडसाठी रु.67,500/- कर्ज मिळाले. त्यातील रु.25,000/- ची परतफेड झाली. न्युक्लिअस बजेटमधून इमारतीसाठी रु.25,000/- उपलब्ध झाले.

संस्थेत 9 महिला सभासदांचे कार्यकारी मंडळ आहे. इमारत व यंत्रसामुग्री ही संस्थेची मालमत्ता आहे.

संस्थेत उत्पादित झालेल्या मालास कायमस्वरुपी बाजारपेठ आहे. उदा.समर्थभांडार ठाणा, आश्रमशाळेतील टेंडर्स, सहकारी बोर्डाची प्रदर्शने, कृषी विज्ञानकेंद्र, कोसबाड.

तसेच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण केंद्र पुणे येथेही विक्रीस ठेवली जातात. यावर्षी संस्थेद्वारा भरलेल्या प्रदर्शनात रु.13,070/- एवढे उत्पन्न मिळाले. या सर्व माध्यमातून झालेल्या विक्रीतून रु.15,000/- निव्वळ व्यापारी नफा गतवर्षी झाला व निव्वळ नफा रु.10,000/- झाला. संस्थेचे दरवर्षी ऑडीट होते. मागील 3 वर्षापासून संस्थेस लेखापरीक्षेत "अ" वर्ग मिळत आहे.

तक्ता क्र•5•13 मध्ये दर्शविल्याप्रमाणे 86 टक्के संस्था या स्वतःच्या संस्थेतील कारागिरांव्यतिरिक्त बाहेरील कारागिरांना प्रशिक्षण देत असतात• हा प्रशिक्षण कालावधी 1 महिन्यापासून 6 महिनेपर्यंत असतो• प्रशिक्षण कालावधीत राहणे, जेवण या खर्चाव्यतिरिक्त रु•300/- पर्यंत अनुदान दिले जाते• यात "अॅकेडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स" या संस्थेमार्फत बांबू व वेतकामाचे प्रशिक्षण दिले जाते• पुणे जिल्हा आदिवासी प्रशिक्षण संस्थेत वेगवेगळया प्रकारचे शोपीस व तत्सम वस्तुंचे जव्हार तालुका आदिवासी भगिनी संस्थेमार्फत खाद्यपदार्थ, शिवणकाम यांचे प्रामुख्याने प्रशिक्षण दिले जाते•

"जनसेवा दत्ताश्रम ट्रस्ट" सोडली तर उर्वरीत सर्व संस्था बाहेरील सभासदांना प्रशिक्षण देण्याचे कार्य करतात• ही संस्था रोग्यांना वनौषधी देण्याचे सेवा कार्य करते•

## 5•16 आर्थिक सहाय्य व संस्थेमार्फत तयार होणा-या कलाकृतींची विक्री व्यवस्था

संस्थेमार्फत तयार होणा-या कलाकृतींचे प्रमाण लक्षात घेता या संस्थांना शासनाचे अथवा बँकेचे आर्थिक सहाय्य होते का ? होत असल्यास किती ? सभासदांकडून भांडवल उभारणीसाठी काही पैसे उभे केले जातात का ? वस्तु तयार झाल्यावर त्यांच्या विक्रीची व्यवस्था इ•बाबतची माहिती तक्ता क्र•5•14 मध्ये सविस्तर आली आहे•

ठाणे जिल्हयातील महिला सहकारी संस्थेस मशिनरी विकत घेण्यासाठी अर्बन को•ऑप बँकेचे सहाय्य झाले• या व्यतिरिक्त शासकीय कर्ज व खादी ग्रामोद्योग भांडाराकडून कर्ज उपलब्ध झाले• एकूण 14 टक्के संस्थांना बँकेकडून कर्ज उपलब्ध झाले• 71 टक्के संस्थांना शासनाची मदत मिळाली• तर 14 टक्के भांडवल हे सभासदांकडून उपलब्ध झाले• याचाच अर्थ या बहुतेक नोंदणीकृत असलेल्या संस्थांनी शासकीय मदतीद्वारे संस्थांचा विकास साधला आहे• भांडवल उभारणीचे महत्वाचे कार्य शासनाच्या मदतीने पार पडले•

संस्थांनी तयार केलेल्या वस्तुंना विक्रीची काय व्यवस्था आहे हे पाहिले असता 100 टक्के संस्थांची विक्री व्यवस्था उत्तम आहे• 71 टक्के संस्था वेगवेगळया प्रदर्शनामधून भाग घेतात• प्रदर्शने भरविण्यासाठीही शासनाकडून विशिष्ट रक्कमेची तरतूद होत असते• 29 टक्के संस्था डिपार्टमेंटल स्टोअर्स व 29 टक्के संस्था दुकानांमधून वस्तु विक्रीस ठेवतात• याशिवाय प्रत्येक संस्थांचा वर्कशॉप आहे• तेथून 57 टक्के संस्थांची कलाकृतीची विक्री

तक्ता क्र ५.१५
संस्थांच्या विक्रीस मिळणारा प्रतिसाद

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | संस्थेचे नांव | भाग भांडवल मर्यादा | शासनाकडून आर्थिक मदत | | | | विक्रीला प्रतिसाद | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ५०० ते १००० | १००१ ते १५०० | १५०१ ते २००० | २००१ ते ३००० | अल्प | मध्यम | सर्व-साधारण | चांगला | उत्कृष्ट |
| १. | रायगड | कर्जत | ॲकडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स | १६,००० | - | - | - | १ लाख | - | - | - | होय | - |
| २. | रायगड | कर्जत | फूड सायन्स एक्सटेंशन सेंटर ॲकडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स | - | - | - | - | - | - | होय | - | - | - |
| ३. | रायगड | खालापूर | अनुभवी प्रशिक्षण केंद्र | - | - | - | - | - | - | - | - | होय | - |
| ४. | पुणे | हवेली | पुणे जिल्हा आदिवासी प्रशिक्षण संस्था | १५,००० | - | - | - | १५,००० | - | - | - | - | होय |
| ५. | पुणे | आंबेगांव | जनसेवा दत्ताश्रम ट्रस्ट | - | - | - | - | २ लाख | - | - | - | - | होय |
| ६. | ठाणे | जव्हार | जव्हांर तालुका आदिवासी भगिनीं औद्योगिक उत्पादन संस्था, मर्यादित | १,००,००० | - | - | - | १लाख | - | - | - | - | होय |
| ७. | नागपूर | | अपुप निर्माण संस्था | - | - | - | - | - | - | - | - | होय | - |
| | | | एकूण | - | - | - | - | - | - | १ | - | ३ | ३ |
| | | | टक्केवारी | - | - | - | - | - | - | १४ | - | ४३ | ४३ |

होते तक्ता क्र•5•14 वरून प्रत्येक संस्था एकावेळी वस्तु विक्रीसाठी दोन/तीन मार्गाचा अवलंब करतात• यातूनच विक्रीसाठी संस्था यशस्वी झाल्याचे आढळून येते•

5•17 शासकीय मदत व विक्रीचा प्रतिसाद

उपरोक्त प्रमाणे 71 टक्के संस्थांना शासकीय मदत उपलब्ध झाली आहे• पण प्रत्येक संस्थेला मिळालेली कर्जाची मर्यादा व वस्तु विक्रीसाठी जनतेचा नेमका प्रतिसाद याची माहिती तक्ता क्र•5•15 वरून दिसून येईल•

तक्ता क्र•5•15 चे विश्लेषण केले असता, सर्व संस्थांना मोठया प्रमाणात शासकीय मदत उपलब्ध होते• 15 हजार ते दोन लाख रुपयापर्यंत मदत शासनामार्फत होत असल्याचे आढळून येते• याशिवाय प्रदर्शन आयोजित करण्यासही शासना (केंद्र सरकार)कडून स्वतंत्र तरतूद केली जाते व अशी प्रदर्शने दरवर्षी भरवली जातात• याचाच अर्थ शासकीय मदतीमुळेच या संस्था अधिक यशस्वी झाल्या आहेत• उर्वरित दोन संस्थांनाही शासनाकडून मदत मिळाली आहे• जनसेवा दत्ताश्रम संस्थेस पुणेजवळील नसरापूर येथे 15 एकर जमीन व मुख्यमंत्री निधीतून रु•दोन लाख 1993-94 या वर्षी वनौषधीची लागवड व जोपासना करण्यासाठी दिली आहे• यावरून संस्थांना शासनाच्या मदतीचा ओघ किती मोठया प्रमाणावर आहे याची कल्पना येते•

वस्तु निर्मितीनंतर वस्तुविक्रीसाठी ग्राहकांचा प्रतिसाद कसा आहे हे जाणून घेतले असता 14 टक्के संस्थांना ग्राहकांचा मध्यम प्रतिसाद आहे तर 83 टक्के संस्थांना उत्कृष्ट व 43 टक्के संस्थांना चांगला प्रतिसाद असल्याचे आढळून आले आहे• काही वस्तुंना सिझनप्रमाणे वस्तुंची मागणी असल्याने मागणीच्या प्रतिसादामध्ये कमी अधिक प्रमाण दिसून येते•

3 संस्थांची भागभांडवल मर्यादा रु15,000/- च्या पुढे आहे• उर्वरित संस्थांच्या भागभांडवलाची मर्यादा त्यांच्या प्रतिनिधींना सांगता आली नाही• तथापि, भांडवल उभारणीसाठी शासनाकडून/बँकेकडून मदत उपलब्ध झाली आहे•

5•18 कच्चामाल व जागेची उपलब्धता

कलावस्तुंच्या निर्मितीसाठी संस्थांना कच्चामाल कोठून उपलब्ध होतो• तसेच कलाकृती निर्मितीसाठी संस्थांना जागेची काय सोय उपलब्ध आहे, या बाबी तक्ता क्र•5•16 वरून आपणास समजून येतील•

तक्ता क्र•5•16 चे विश्लेषण केले असता संस्था मोठया प्रमाणत वस्तु तयार करून विकतात• यासाठी 14 टक्के संस्थांना स्थानिक ठिकाणी कच्चामाल उपलब्ध होतो व 86

तक्ता क.५.१६
कच्चा माल व जागेच्चा उपलब्धतेचे वर्गीकरण

| अ.क. | जिल्हा | तालुका | संस्थेचे नांव | निर्मितीसाठी कच्चा माल | | | | जागेची उपलब्धता | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | स्थानिक | जंगल | विकत | अन्य | घरात | स्वतंत्र | वर्कशॉप | भाडयाची जागा |
| १. | रायगड | कर्जत | ॲकेडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स | - | - | होय | - | - | - | होय | - |
| २. | रायगड | कर्जत | फूड सायन्स एक्सटेंशन सेंटर ॲकेडमी ऑफ डेव्हलमेंट सायन्स | होय | - | होय | - | - | - | होय | - |
| ३. | रायगड | खालापूर | अनुभवी प्रशिक्षण केंद्र | - | - | होय | - | - | होय | - | - |
| ४. | पुणे | | पुणे जिल्हा आदिवासी प्रशिक्षण संस्था | - | - | होय | - | - | होय | - | - |
| ५. | पुणे | आंबेगांव | जनसेवा दत्ताश्रम ट्रस्ट | - | - | होय | - | - | होय | - | - |
| ६. | ठाणे | जव्हार | जव्हार तालुका आदिवासी भगिनी औद्योगिक उत्पादन संस्था | - | | - | - | - | - | होय | - |
| ७. | नागपूर | - | अप्रुप निर्माण संस्था | - | होय | - | - | होय | - | - | - |
| | एकूण | | | १ | १ | ६ | - | १ | 3 | 3 | - |
| | टक्केवारी | | | १४ | १४ | ८६ | - | १४ | ४3 | ४3 | - |

टक्के संस्थांना कच्चा माल विकत घ्यावा लागतो. यामध्ये बांबू वेत हा मोठया प्रमाणावर लागणारा कच्चामाल विकत घ्यावा लागतो. कच्चामालावर प्रक्रिया करुन त्याचे कलाकृतीत रुपांतर करण्यासाठी 3 (43 टक्के) संस्थांचा स्वतःचा वर्कशॉप आहे, 3 (43 टक्के) संस्थांची स्वतंत्र जागा आहे. तर एक संस्था सभासदास कच्चामाल वस्तु तयार करण्यासाठी घरी देत असते. अशाप्रकारे सभासदाने घरी वस्तु तयार करुन संस्थेकडे आणून द्यावयाच्या असतात.

5.19 आदिवासी विकास विभागाच्या "आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थे" मार्फत आदिवासी हस्तकलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांनी तयार केलेल्या वस्तु नागरी लोकांना पाहण्यास खुल्या करण्यासाठी वर्षातून एकदा प्रदर्शन भरविण्यात येते. 1994-95 वर्षाचे हे 11 वे प्रदर्शन होते. अशा प्रदर्शनात संस्थाद्वारे सहभाग घेतला जातो का ? सहभाग घेतला जात असल्यास आतापर्यंत कितीवेळा नोंदणी झाली, याची माहिती तक्ता क्र.5.17 मध्ये दर्शविण्यात आली आहे. माहितीचे विश्लेषण केले असता 7 संस्थापैकी 4 (57 टक्के) संस्था या नियमित सहभाग घेत असल्याचे आढळून आले. उर्वरित तीन संस्थांचा आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत भरविण्यात येणा-या प्रदर्शनांना प्रथमच सहभाग होता. याशिवाय सर्व (100) टक्के संस्थांना कायमस्वरुपी बाजारपेठ उपलब्ध असल्याचे त्यांच्या प्रतिनिधींनी मुलाखतीच्या वेळी सांगितले. तसेच तक्ता क्र.5.14 नुसार संस्थेची स्वतःचीच प्रदर्शने भरविली जातात. यासाठी स्वतंत्र तरतूदही केली जात असते.

वास्तविक आदिवासी हस्तकलांना बाजारपेठ उपलब्ध करुन देणे हा प्रदर्शन भरविण्याचा मुख्य हेतू आहे. असे असताना सर्व संस्थांची विक्री व्यवस्था उत्तम असताना वरील सर्व प्रकारच्या संस्थांना आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेद्वारा भरविण्यात येणा-या प्रदर्शनाच्या "मोफत" सुविधेचा लाभ देण्याची गरज आहे, असे वाटत नाही. यांचे जागेवर वैयक्तिकरित्या हस्तकलाकारांची संख्या वाढवून त्यांना याचा लाभ घेण्याची संधी द्यावी, असे अनुमान काढता येईल. अन्यथा या संस्थांना आदिवासी विकास विभागाच्या प्रदर्शनात सहभागी व्हायचे असेल तर स्वखर्चाने येण्यासही हरकत नसावी.

तक्ता क. ५.१७

कच्चा माल व जागेच्या उपलब्धतेचे वर्गीकरण

| अ.क. | जिल्हा | तालुका | संस्थेचे नांव | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या प्रदर्शनात नियमित सहभाग आहे का ? | हस्तकला विकीसाठी कायमस्वरुपी बाजारपेठ आहे का ? |
|---|---|---|---|---|---|
| १. | रायगड | कर्जत | ॲकेडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स | होय | होय |
| २. | रायगड | कर्जत | फूड सायन्स एक्सटेन्शन सेंटर ॲकेडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स | होय | होय |
| ३. | रायगड | खालापूर | अनुभवी प्रशिक्षण केंद्र | (नाही/पहिले प्रदर्शन) | होय |
| ४. | पुणे | | पुणे जिल्हा आदिवासी प्रशिक्षण संस्था | (नाही/पहिले प्रदर्शन) | होय |
| ५. | पुणे | आंबेगांव | जनसेवा दत्ताश्रम ट्रस्ट | होय | होय |
| ६. | ठाणे | जव्हार | जव्हार तालुका आदिवासी भगिनी औद्योगिक उत्पादन संस्था | होय | होय |
| ७. | नागपूर | - | अप्रुप निर्माण संस्था | (नाही/पहिले प्रदर्शन) | होय |
| | एकूण | | | ४ | ७ |
| | टक्केवारी | | | ५७ | १०० |

## प्रकरण 6 वे

## निष्कर्ष

आदिवासींची हस्तकला ही त्यांच्या गरजा व आजूबाजूच्या वातावरणातून सहज उपलब्ध होणारा कच्चामाल यांच्या माध्यमातून तयार झाली आहे. अशाप्रकारे त्यांच्या गरजांवर आधारीत अशी ही हस्तकला केवळ स्वतःपुरते मर्यादित वस्तूंचे उत्पादनातून झालेली आहे. शहरी जीवनाप्रमाणे इतरांनी निर्माण केलेल्या कलावस्तु या आदिवासींपर्यंत पोहोचलेल्या नसल्याने मनःपूर्वक स्वतःचे पूर्ण कसब त्याला लावून स्वतःकरिता स्वनिर्मित वस्तूंच्या वापरांवर आदिवासींचा भर दिसून येतो. हस्तकला कृतींवर आदिमत्वाचा ठसा उमटलेला असतो. निसर्गातील कल्पनांचा आधार घेऊन सुबक व रेखीव कलाकृती निर्माण करणारा आदिवासी "कारागिर" किंवा "कलाकार" म्हणून ओळखला जातो.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत भरविण्यात येणा-या प्रदर्शनासाठी जेव्हा आदिवासी हस्तकलाकाराची निवड केली जाते, तेव्हा त्याला पत्र पाठवून कळविण्यात येते. त्यानंतर हा कलाकार स्वतःजवळची कामे बाजूला ठेवून अथवा रोजगारावर जाण्याचे टाळून हस्तकलाकृतींचे उत्पादन करण्यास सुरवात करतो. याचा अर्थ वर्षभर त्याचे कलाकृतीचे उत्पादन सुरु नसते. यासाठी हस्तकलाकारास येणा-या प्रमुख अडचणी म्हणजे कलाकृतीसाठी लागणारे आर्थिक भांडवल हे होय. भांडवल उभारणीसाठी कलाकारास वारंवार पैशाच्या मागणीसाठी {कर्जरुपात} प्रकल्प अधिका-याकडे जावे लागते. प्रकल्प अधिकारी कार्यालयात जाण्या-येण्यामध्ये वेळ व पैसा खर्च होत असतो. केवळ तुटपुंज्या भांडवलासाठी जाण्या-येण्याचा आर्थिक भार त्याला सहन करावा लागतो. कर्ज मंजूर होते, त्यावेळी तो हा आर्थिक भार सहनही करतो. कर्ज मिळत नाही, अशी खात्री झाल्यावर आदिवासी कारागिर प्रदर्शन जवळ आल्यावर नातेवाईक व जवळची मंडळी यांचेकडून कर्ज काढून, उसने घेऊन भांडवलापुरती गरज भागवितो व त्यानंतर कलाकृती तयार करुन प्रदर्शनात सहभागी होतो.

आदिवासींच्या अनेक प्रकारच्या हस्तकलाकृती आहेत. यातील सगळेच या कलाप्रदर्शनात सहभाग घेऊ शकत नाहीत, याची प्रमुख कारणे म्हणजे भांडवलाची कमतरता व त्यामुळे कमी असलेली उत्पादन क्षमता. रोजच्या उत्पन्नावर उदरनिर्वाह अवलंबून असल्याने स्वतःचा रोजगार बुडवून वस्तुनिर्मिती करणे शक्य नसणे, काही वेळा वरील सर्व बाबी असल्या तरी पुण्यापर्यंत येण्यासाठी एस.टी.भाडयाइतकेही पैसे जवळ नसणे. या कारणामुळे बहुसंख्य आदिवासी हस्तकलाकार प्रदर्शनामध्ये हस्तकलाकृती सादर करु शकत नाहीत. आठ दिवसांच्या आदिवासी हस्तकला प्रदर्शनामध्ये कलाकारास मोठया प्रमाणावर उत्पन्न मिळते. हस्तकलाकृती निर्मितीच्या

कालावधीत बुडालेल्या रोजगाराची भरपाई होते• थोडया कालावधीत भरपूर पैसे हाती येतात• या दृष्टीने कलाकार या प्रदर्शनामध्ये सहभागी होण्यास उत्सुक असूनही कोणत्या न कोणत्या कारणामुळे सहभागी होणे त्यांना शक्य होत नाही•

सर्व्हेक्षण पाहणीतील निवडलेल्या ठाणे, पुणे, परभणी, नाशिक, भंडारा, गडचिरोली, रायगड व नागपूर या जिल्हयातील लाभार्थ्यासंबंधी गोळा केलेल्या माहितीच्या आधारे खालील निष्कर्षाप्रत अभ्यासगट आला•

सर्वसामान्य निष्कर्ष
-------------

1• मुलाखतीद्वारे असे आढळून आले की, 63 टक्के लाभार्थी रु• 3,600/- या उत्पन्न गटातील आढळले तर रु•6,400/- पर्यंत उत्पन्न असणारे केवळ 5 टक्के लाभार्थी आढळले• उर्वरित 32 टक्के लाभार्थींना उत्पन्नाची मर्यादा सांगता आली नाही•

सर्व कलाकार दारिद्रय रेषेखालील आढळले•

2• 25 वर्षेपर्यंत 16 टक्के 40 ते 45 या वयोगटातील 21 टक्के व 55 च्या पुढे 16 टक्के हस्तकलाकार आढळले• तथापि जास्तीत जास्त §47 टक्के§ हस्तकलाकार 26 ते 40 या वयोगटातील आहेत• याचाच अर्थ तरुण पिढी या व्यवसायाकडे फारसे आकर्षित होत नसल्याचे दिसते याची कारणे भांडवलाची कमतरता व कमी उत्पन्न हे होय•

3• हस्तकलाकारांच्या शैक्षणिक विभागणीनुसार एक मोठा गट §32 टक्के§ निरक्षर असून तेवढेच लाभार्थी केवळ प्राथमिक §1 ली ते 4 थी§ शिक्षण घेतलेले आढळले•

उर्वरित 46 टक्के लाभार्थी 5 वी ते 7 वी पर्यंत शिक्षण घेतलेले आढळले• उच्चशिक्षित आदिवासी हस्तकलेच्या क्षेत्रात आढळून येत नाहीत•

4• हस्तकलाकृतीमध्ये प्रामुख्याने बांबू व वेळूपासून बनविलेल्या वस्तुंचे प्रमाण अधिक होते•

5• हस्तकला व्यवसाय करणारांमध्ये निरक्षर व अल्पशिक्षित व्यक्तींचा समावेश अधिक आहे•

सर्व कलाकारांपैकी अप्रशिक्षित हस्तकलाकारांचे प्रमाण 74 टक्के आहे• त्यातील 68 टक्के कलाकारांचा हा परंपरागत व्यवसाय आहे• तरीसुध्दा त्यांच्यापैकी 26 टक्के लाभार्थींनी व्यावसायिक प्रशिक्षण घेतले• उर्वरित 32 टक्के हस्तकलाकारांपैकी 6 टक्के कलाकार परंपरागतही नाहीत व अप्रशिक्षितही नाहीत•

6• निवड झालेल्या कलाकारांची यादी दीड महिने आधी प्रकल्प अधिका-यांना पाठविण्यात आली• जेणेकरुन प्रकल्प कार्यालयाकडून कलाकारास त्वरीत अर्थसहाय्य उपलब्ध होईल, अशी अपेक्षा होती• तथापि, पाहणीमध्ये 32 टक्के §6§ हस्तकलाकारांना भांडवल उभारणीसाठी रु•2,000/- पासून रु•5,000/- पर्यंत प्रकल्प अधिका-यांकडून आर्थिक मदत उपलब्ध झाली, तर 52 टक्के हस्तकलाकारांनी स्वकष्टाने भांडवल उभे केले• अशारितीने स्वबळावर भांडवल उभे करण्याचे प्रमाण जास्त आहे•

वास्तविक प्रकल्प अधिका-यांनी हस्तकलाकारांना त्वरीत कर्ज द्यावे, हा उद्देश• पण प्रकल्प अधिकारी स्तरावरुन याची गंभीर दखल घेतली गेली नाही• वांबूकाम करणारे चंदर सुळे व अन्य 4 लाभधारक यांनी वारवार कर्जाची मागणी केली पण कर्ज मंजूर झाले नाही• या हस्तोद्योजकांनी वारंवार कळवण व संबंधित प्रकल्प कार्यालयात जाऊनही कर्ज मंजूर झाले नाही• तर कृष्णा राऊत या लाकडी मुखवटे करणा-या हस्तकलाकारास कर्ज मंजूर झाले, पण प्रदर्शनासाठी येईपर्यंत नाशिक प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडून त्यांना रक्कम हातात पडली नाही• अशीच स्थिती इतरही काही कलाकारांची झाली•

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थसेने कलाकारांच्या नावानिशी यादी पाठवून विनंती करुनही प्रकल्प कार्यालयाकडून अशाप्रकारे उदासिनता दाखविली जात असेल तर इतर कार्यालयाकडून कोणतीही अपेक्षा करण्यात अर्थ नाही• तसेच महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ व तत्सम इतर कार्यालये/संस्थांनीही या कलाकारांना असेच उपेक्षित ठेवल्यास त्यांना फारसा दोष देता येणार नाही• आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे नियंत्रण प्रकल्प अधिका-यांवर नसल्याने या संस्थेसही विशेष पाठपुरावा करणे शक्य झालेले दिसून येत नाही•

7• 42 टक्के कारागिर तयार केलेल्या वस्तु घरगुती मागणीनुसार शेजारीपाजारी जाऊन विक्री करतात• तर 37 टक्के कारागिरानां विक्रीची कोणतीही व्यवस्था उपलब्ध नसल्याचे आढळून आले• प्रदर्शनातील विक्रीस 42 टक्के कारागिरांना ग्राहकांचा चांगला व 37 टक्के कारागिरांना उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला असल्याचे आढळून आले• हस्तकलाकारांना विक्री व्यवस्था नाही• या सर्वांना सार्वजनिक विक्रीची संधी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत होते• तसेच त्यांना नियमित विक्री व उत्पन्न मिळत नाही• हे सर्व कारागिर केवळ आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत भरणा-या प्रदर्शनात वर्षातून एकदा सहभागी होतात व त्याद्वारे आपल्या वस्तु या प्रदर्शनात ठेवतात• त्यामुळे हस्तकला ही नियमित व्यवसाय म्हणून कोणीही अंगिकारलेली दिसून येत नाही•

8• आदिवासी हस्तकलाकाराने तयार केलेल्या वस्तु अतिशय मजबूत व टिकाऊ असतात•

मालाचा दर्जाही उच्च प्रतीचा असतो. या वस्तु तयार करण्यासाठी चांगल्या प्रतीच्या कच्च्या मालाचा उपयोग करण्यात येतो. वस्तुनिर्मितीचा खर्च व वस्तु किती किंमतीस विकली जावी याचा कोठेही समन्वय साधलेला दिसून येत नाही. व्यापारीवृत्तीने वस्तुची विक्री केली जात नाही. उपलब्ध माल स्वतः जवळील ज्ञान यांचा वापर करुन आदिवासी सुबक वस्तु तयार करतो. पण यासाठी लागणारा वेळ, खर्च व ज्ञान यांचा मेळ घालण्याचे तंत्र आदिवासी हस्तकलाकारास माहिती नाही. त्यामुळे वस्तुंची किंमत किती येईल याचा हिशोब येत नाही. त्यामुळे व्यापारीवृत्तीने माल विकला जात नाही. पर्यायाने नफा व खर्च यांचा ताळमेळ बसत नाही.

वस्तुंची निर्मिती व येणारा खर्च कशारितीने करावा याचे तंत्र त्यांचेकडे आढळत नाही. प्रदर्शनासाठी आणलेला माल येईल, त्या किंमतीस विकून टाकण्यात येतो.

9. व्यक्तीगत हस्तकला व्यवसायामध्ये 32 टक्के लाभधारकांच्या कुटुंबातील 22 सभासद त्यांना याकामी मदत करतात व 32 टक्के कारागिरांना कुटुंबाबाहेरील 23 व्यक्तींची मदत होते. एकट्याने काम करणारे 36 टक्के कारागिर आहेत, जे कोणाची मदत घेत नाहीत, पर्यायाने 64 टक्के कलाकार प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या तितक्याच व्यक्तींना रोजगार पुरवितात. 12 कलाकारांनी 45 व्यक्तींच्या मदतीने हे काम केले, याचाच अर्थ एका कलाकारामागे 3 ते 4 व्यक्तींना रोजगार उपलब्ध झाला आहे.

10. आदिवासी हस्तकलाकारांच्या कलाकृतीस प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने व आदिवासी कलाकृती सर्वसामान्यापर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने शासनाकडून जाणीवपूर्वक प्रयत्न होत आहेत. याचाच एक भाग म्हणून संस्थेमार्फत दरवर्षी भरविण्यात येणारे प्रदर्शन होय. या प्रदर्शनास 47 टक्के कारागिर नियमित सहभाग घेत असल्याचे दिसून आले. उर्वरित 53 टक्के कारागिर प्रदर्शनासाठी प्रथम, दुस-यांदा व तिस-यांदा आगमन होत आहे. या कलाकारांच्या वस्तुच्या नियमित विक्रीची व्यवस्था नसल्याने आदिवासी हस्तकलेच्या प्रसारांचा प्रयत्न केला जातो.

कलाकारांचा उत्साहाने या प्रदर्शनात सहभाग व लोकांचा प्रतिसाद यांच्याकडे बघितले तर प्रदर्शन भरविण्याचा उद्देश 80 टक्के सफल झाला आहे. उर्वरित 20 टक्के यशस्वीता नाही याची कारण, आदिवासींना विक्रीची कला, विक्रीच्या वेळचे संभाषण चातुर्य, ग्राहकांशी संवाद, या गोष्टींच्या प्रशिक्षणाचा अभाव, 11 वर्षापासून कलाकार प्रदर्शनात भाग घेतात पण यातील कोणतेही कलाकार स्वबळावर इतरत्र कोठेही प्रदर्शनात भाग घेत नाहीत. यादृष्टीने आपण कलाकारांना तयार करु शकलो नाहीत.

11. 42 टक्के कारागिरांना प्रशिक्षण घेण्याची इच्छा आहे. तथापि प्रशिक्षण कोठे मिळते याची माहिती नसल्यामुळे ते प्रशिक्षणापासून वंचित आहेत.

12. महिला सहकारी संस्था व इतर संस्था

---

महिला सहकारी संस्था अधिक यशस्वी होत असल्याचे पाहणीमध्ये आढळून आले.

विविध प्रकारची कामे देऊन महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देता येते.

एकूण सात संस्थांच्या वतीने 659 व्यक्तींना कायमस्वरुपी रोजगार पुरविण्यात आला आहे. यात 1 महिला सहकारी संस्था कार्यरत आहे व यशस्वी होत आहे.

सहकारी संस्था अधिक यशस्वी होत आहेत. अशा संस्थाना सहकार विभाग व आदिवासी विकास विभागाच्या सहकार्याने उत्तेजन देता येईल.

13. संस्थांची विक्री व्यवस्था तपासली असता असे आढळून आले की, डिपार्टमेंटल स्टोअर्स, प्रदर्शने व संस्थेचे स्वतःचे दुकान/वर्कशॉप या माध्यमातून विक्री होत असल्याने 100 टक्के संस्थांची विक्री व्यवस्था उत्कृष्ट आहे.

या संस्थाना कायमस्वरुपी बाजारपेठ उपलब्ध झाली आहे.

14. मध्यम व मोठया प्रमाणात सभासद संख्या असणाऱ्या 71 टक्के संस्थांना रु.15,000/- पासून रु.दोन लाखापर्यंत शासकीय मदत उपलब्ध झाली आहे. याशिवाय संस्थाना दरवर्षी प्रदर्शने आयोजित करण्यास केंद्र सरकारकडूनही आर्थिक तरतूद उपलब्ध होते.

15. 86 टक्के संस्था त्यांच्या संस्थेतील सभासदव्यतिरिक्त बाहेरील कारागिरांना 1 महिन्यापासून ते 6 महिनेपर्यंत प्रति व्यक्ती रु.300/- अनुदान देऊन प्रशिक्षण देण्याचे कार्य करतात.

16. महिला सहकारी संस्थेमार्फत विक्रीस ठेवलेले पदार्थ/वस्तु आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अत्यंत दुर्गम भागात तयार करण्यात आले आहेत. त्यांच्या मालाचा दर्जा व किंमत शहरी भागातील त्याच प्रकारच्या वस्तुंच्या तुलनेत अत्यंत कमी होत्या. या माध्यमातून आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने आदिवासींकडून उत्पादित होणारा माल उत्कृष्ट व चांगल्या प्रकारचा आहे, याचा एकप्रकारे प्रसारच केला आहे.

17. जिल्हा उद्योग केंद्र :-

---

जिल्हा उद्योग केंद्राकडे (डी.आय.सी.) आदिवासींसाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकारची स्वतंत्र योजना आहे.

तथापि, ठरवून दिलेलया उदिष्टापर्यंत आदिवासी उमेदवार/उद्योजक लाभ घेऊ शकत नाही. (उदा. 1994-95 या आर्थिक वर्षात 368 प्रकरणे मंजूर झाली. त्यात फक्त तीन आदिवासी लाभधारक होते व त्यांना रु. 16,000/- चे अर्थसहाय्य देण्यात आले.) आदिवासी उद्योजक लाभधारकाचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. आदिवासी लाभधारक पुरेशा प्रमाणात उपलब्ध न होण्याचे कारण जाणून घेतले असता जिल्हा उद्योग अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की,

अ) इतर खात्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांना 50 टक्क्यांपासून ते 100 टक्केपर्यंत अनुदान मिळते. मात्र जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी अनुदान नसते. बँकामार्फत कर्जवाटप होत असल्याने त्यावर 5 टक्के व्याजदर आकारण्यात येतो. हा व्याजदर आदिवासी लाभधारक व सर्वसामान्य लाभधारक यांना सारखाच आहे. म्हणून अशाप्रकारच्या योजनांचा लाभ घेण्यास आदिवासी पुढे येत नाही.

ब) जिल्हा उद्योग केंद्राकडील भांडवली योजनांना उमेदवाराचा, लाभधारकांचा स्वतःचा 5 टक्के वाटा जमा करावा लागतो, त्याशिवाय बँकाकडून कर्ज उपलब्ध होत नाही.

क) मोठ्या स्वरुपात कर्ज उपलब्ध होत असल्याने बँकाकडे तारण मालमत्ता ठेवावी लागते. (शासकीय नियमानुसार ही अट नाही. तथापि, लाभधारकावरील अविश्वासामुळे बँका बेकायदेशीररित्या तारण घेतात.) आदिवासी लाभधारकाकडे मुळातच स्वतःची मालमत्ता कमी व अशाप्रकारे मालमत्ता तारण देण्यास तो अपात्र ठरतो. पर्यायाने आदिवासी लाभधारक वरील योजनांपासून वंचित राहतात.

18. जिल्हा उद्योग केंद्राकडून खास आदिवासींसाठी हस्तकला व तत्सम उद्योगांचे तीन महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात येत होते. या कालावधीत प्रशिक्षणार्थीस मानधनही देण्यात येत होते. तथापि या उद्योगातून तयार होणाऱ्या वस्तुंना कायमस्वरुपी बाजारपेठ उपलब्ध नसल्याने ही योजना जिल्हा उद्योग केंद्राकडून काढून महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ यांचेकडे सन 1992 पासून वर्ग करण्यात आली. तथापि महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळाने यावर अद्याप अंमलबजावणी केली नसल्याचे पाहणीत आढळून आले आहे.

19. महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ

आदिवासी हस्तकलांचा प्रचार व याकरिता आणि त्या कलावस्तुंच्या विक्री व्यवस्थेसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांनी खास प्रयत्न म्हणून नाशिक येथील मुख्यालयात तसेच त्यांच्या प्रादेशिक कार्यालयातून आदिवासी हस्तकला वस्तु विक्रीसाठी व्यवस्था करण्याचे शासनाचे आदेश आहेत.

तथापि, या महामंडळाकडून असा कोणताही प्रयत्न अद्यापपर्यंत केला गेलेला नाही. हस्तकलेच्या विकासात महामंडळांचा कोणताही सहभाग दिसून आलेला नाही.

20. महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ

महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडे विक्रीचा व्यवस्था असताना देखील आदिवासी हस्तोद्योजक यापासून फायदा घेत नाहीत. त्यांचा कारणांचा आढावा घेतला असता.

अ) आदिवासी हस्तोद्योजकांना महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडे विक्री व्यवस्था आहे याची माहिती नाही.

ब) वस्तु तयार झाल्यावर महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाच्या पुणे, मुंबई, नागपूर, कोल्हापूर या केंद्रामध्ये विक्रीसाठी ठेवण्यात येते. यासाठी हस्तकलाकारास स्वखर्चाने यावे लागते आणि हस्तकलाकारास हा खर्च म्हणजे फायद्यापेक्षा तोटा अधिक असल्याने परवडत नाही.

क) वस्तुच्या ठरविलेल्या किंमतीच्या 10 टक्के रक्कम महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळास द्यावी लागते.

वरील सर्व त्रास घेऊन लाभाधारकास आर्थिक फायदा होणे दूरच उलट स्वतःचे अधिक पैसे खर्च होतील. पर्यायाने लाभधारक ही जबाबदारी पार पाडण्यास अनुत्सुक असतात.

प्रकरण क्र•7

## सूचना तथा शिफारशी

पाहणीमधून हस्तकलाकारांच्या हस्तकलेविषयी काही शिफारशीवजा सूचना करता येतील त्या पुढीलप्रमाणे-

### §1§ आदिवासी हस्तकलेचे प्रशिक्षण

आदिवासी हस्तकलाकृती तयार करण्यामध्ये प्रशिक्षण घेतलेल्या लभाधारकांचे प्रमाण कमी आहे• प्रशिक्षण घेतल्यास आदिवासी हस्तकलाकृती अधिक आकर्षक व कलात्मक व सुबक होतील•यासाठी खालील उपाययोजना सुचविल्या आहेत•

अ• आदिवासी उपयोजना क्षेत्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये §आय•टी•आय•§ प्रवेश देताना शैक्षणिक अट शिथिल करण्यात येऊन आदिवासी हस्तकलाकारागिरांना प्राधान्याने प्रवेश देण्यात यावा•

ब• ट्रायसेम योजनेअंतर्गत जे प्रशिक्षण वर्ग घेतले जातात, त्यात आदिवासी हस्तकलांचा अंतर्भाव करण्यात यावा व प्रशिक्षणार्थींना स्वतःचा व्यवसाय सुरु करण्यासाठी 100 टक्के अनुदान देण्यात यावे•

क• खादी ग्रामोद्योग मंडळामार्फत महाराष्ट्रातील 9 ठिकाणी 11 प्रशिक्षण केंद्र चालविली जातात• तथापि याची माहिती आदिवासींना नाही• या केंद्रामध्ये आदिवासी हस्तकलेचे प्रशिक्षण देण्यात यावे• जर असे प्रशिक्षण घेतले जात नसेल तर महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाने अशाप्रकारचे प्रशिक्षण घेण्याविषयीच्या योजनेचा प्रस्ताव ठेवावा व यासाठी स्वतंत्र खर्चाची तरतूद सुचवावी•

ड• जिल्हा उद्योग केंद्राकडील महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळाकडे वर्ग करण्यात आलेली प्रशिक्षण योजनेची त्वरीत अंमलबजावणी सुरु करण्याच्या सूचना शासकीय पातळीवरुन देण्यात याव्यात•

इ• अनेक स्वयंसेवी संस्था हस्तकला व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याचे काम करतात• पण याची माहिती आदिवासी हस्तकलाकारास नसते• यासाठी प्रशिक्षण देणाऱ्या संस्था व कोणत्या प्रकारच्या हस्तकलेचे प्रशिक्षण देतात, याची माहिती आदिवासी विकास विभागाकडून प्रसिध्द व्हावी किंवा माहिती व जनसंपर्क कार्यालयाकडे प्रसिध्दी देण्यात यावी•

फ. शहरी भागातील लोकांनी आदिवासींची हस्तकला पसंत केली आहे. नाविण्यपूर्ण अशा हस्तकलेला शहरी लोकांनी उत्कृष्ट प्रतिसाद दिला आहे. यासाठी "लोकरुची" नुसार त्यांना प्रशिक्षण दिल्यास ही कला अधिक प्रसिध्दीस येईल. न्युक्लिअस योजनेअंतर्गत अशा प्रशिक्षणामधून या हस्तकलाकृतीस विशेष वाव मिळावा आणि यातून त्यांच्या कल्पनाशक्तीचा विकास व्हावा.

ग. हस्तकलाकारांना व्यवस्थापन, वस्तु विक्रीची कौशल्ये, वस्तुची किंमत काढण्याची पध्दत, ग्राहकांशी वागण्याची कला इ.संदर्भातील प्रशिक्षण आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून देण्यात यावे.

§2§ आदिवासी हस्तकलाकारांना भांडवली कर्ज

------------------------------

वैयक्तिकरित्या हस्तकला करणा-या आदिवासी कारागिरांना भांडवल उभे करण्यामध्ये अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. यासाठी शासनामार्फत, वित्तीय संस्थामार्फत, खादी ग्रामोद्योग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचेमार्फत कर्जपुरवठा करण्याच्या खालील उपाययोजना सुचविण्यात येत आहेत.

अ. खादी ग्रामोद्योग मंडळाला एकूण तरतूदीपैकी 10 टक्के रक्कम आदिवासी, महिला व अपंगासाठी खर्च करण्याची तरतूद आहे. तथापि या उदिष्टापेक्षा अधिक लाभाधारकांनी कर्जाची मागणी केल्यास त्यांच्या मागणीची पूर्तता खादी ग्रामोद्योगाकडून पूर्ण व्हावी.

तसेच नियोजन विभागाकडून आदिवासींसाठी भांडवली कर्जाची तरतूद खादी ग्रामोद्योग महामंडळास वाढवून द्यावी.

ब. जिल्हा उद्योग केंद्राकडून उपलब्ध होणा-या भांडवली कर्जावरील व्याजाचे प्रमाण 5 टक्कयावरुन 2.5 टक्के इतका करण्यात यावा. तसेच 5 टक्के भांडवल स्वतः उभे करण्याची अट आदिवासींसाठी शिथिल करण्यात यावी, जेणेकरुन आदिवासी हस्तोद्योजक अधिक संख्येने कर्ज घेण्यास पुढे येतील.

क. जिल्हा उद्योग संचालनालयाकडून दिल्या जाणा-या कर्जावर बँका बेकायदेशीररित्या "तारण" ठेवण्याची मागणी करतात. या कृतीमुळे आदिवासी हस्तकलाकार कर्ज घेण्यास पुढे येत नाहीत. बँकांच्या अशा बेकायदेशीर कृतीस शासकीय पातळीवरुन अटकाव करण्यात यावा.

ड. आदिवासी हस्तकलाकारास सर्वसाधारणपणे 5 ते 10 हजार रुपयांचे भांडवल लागते. याकरिता रु.10000/- पर्यंतच्या भांडवलावर स्व-भांडवलाची व तारणाची अट रद्द करण्यात यावी.

इ• खादी ग्रामोद्योग व जिल्हा उद्योग केंद्र यांनी कर्ज घेताना लाभार्थी जवळील हत्यारे व यंत्रसामुग्री हीच भागभांडवल अथवा तारण समजून कर्ज द्यावे• तरच आदिवासी लाभधारक कर्ज घेण्याच्या निकषामध्ये बसतील• अन्यथा आदिवासीसाठी असणारी जिल्हा उद्योग केंद्राकडील भांडवली कर्जाची तरतूद यापुढेही खर्च होणार नाही• असे होऊ नये म्हणून खालील उपायांचा विचार व्हावा• आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या तज्ञांकरवी काही निकष निश्चित करण्यात यावेत• उदा•भांडवली कर्ज कोणास द्यावे, कोणत्या प्रकारच्या हस्तकलाकरिता किती रक्कमेपर्यंत कर्ज मंजूर करावे• मंजूर करण्यात येत असलेली रक्कम पुरेशी आहे का ? याबाबत निश्चितता होणे आवश्यक आहे•

फ• हस्तकलाकारांची प्रदर्शनासाठी निवड झाल्यावर आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या शिफारशीवरुन प्रकल्प अधिकाऱ्यांकडून त्वरीत भांडवली कर्जे उपलब्ध करुन देण्यात यावे, जेणेकरुन प्रदर्शन जवळ आल्यावर वस्तु तयार करण्यासाठी भांडवलाविना कुंचबणा होणार नाही•

§3§ आदिवासी हस्तकलेसाठी विक्री व बाजारपेठ

आज आदिवासी हस्तकलाकृतीस कायमस्वरुपी बाजारपेठ उपलब्ध नाही• यासाठी खालील उपाय सुचवावेसे वाटतात•

अ• सहकारी ग्राहक भांडार व डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये आदिवासी हस्तकलांचा समावेश करण्यात यावा व त्याची विक्री व्यवस्था प्राधान्याने व्हावी• शासकीय पातळीवरुन यासाठी विशेष प्रयत्न व्हावेत•

ब• शासनामार्फत "Tribal craft federation" तयार करण्यात येऊन त्यांमार्फत आदिवासी हस्तकलाकारांच्या वस्तुंना परदेशी बाजारपेठ मिळवून द्यावी•

क• आदिवासी हस्तकलाकाराना वस्तु विक्रीसाठी परवाना देण्यात यावा•

ड• महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाच्या केंद्रामध्ये आदिवासीनी तयार केलेल्या वस्तु विनाशुल्क विक्रीस ठेवण्यात याव्यात•

इ• आदिवासी विकास विभागातर्फे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था व आदिवासी विकास महामंडळाच्या सहकार्याने अल्पावधीत आदिवासी हस्तकलाकृती विक्रीसाठी छोटे एम्पोरियम उघडण्यात यावे, जेणेकरुन परदेशी नागरिक व अन्य लोकांना या कलाकृती उपलब्ध होतील•

वरील उपाययोजनांमुळे हस्तकलाकारांचे प्रोत्साहन वाढून अनेक हस्तोद्योजकांना यामध्ये सहभागी होता येईल• पर्यायाने अधिक व्यक्तींना स्वयंरोजगार प्राप्त होईल•

§ 4 § विकास कार्यक्रमांना प्रसिध्दी

अ जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग, महाराष्ट्र राज्य लघु विकास महामंडळ, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था या सर्वांमार्फत आदिवासी हस्तोद्योजकांसाठी कोणत्या प्रकारच्या योजना व त्यांचे स्वरुप या सर्व कार्यक्रमांना त्या त्या विभागामार्फत वेळोवेळी प्रसिध्दी देण्यात यावी•

§ 5 § सर्वसामान्य सूचना

अ• महिला सहकारी संस्था अधिक कार्यक्षमतेने काम करतात• पर्यायाने या संस्था अधिक यशस्वी होतात• करिता महिला सहकारी संस्थांची संख्या वाढविण्यात यावी• यासाठी शासकीय पातळीवरुन विशेष प्रयत्न व्हावेत•

ब• सहकारी संस्थांना बाजारपेठ सहज उपलब्ध होत असल्याने या संस्था अधिक यशस्वी होत आहेत• महिला सहकारी संस्थाव्यतिरिक्त अशाप्रकारच्या संस्थांचीही संख्या वाढविण्यात यावी• पर्यायाने सहकारी संस्थेतील अनेक सभासद व्यक्तींना रोजगार प्राप्त होईल• प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व सहकार विभागाकडून यासाठी विशेष प्रयत्न व्हावेत•

क• हस्तकला उद्योग करणा-या सहकारी संस्थांना आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेद्वारा भरविण्यात येणा-या प्रदर्शनांना येथून पुढे सहभागी होण्याची संधी देण्यात येऊ नये• सहकारी संस्थांची विक्री व्यवस्था उत्तम आहे• तसेच काही आदिवासींसाठी काम करणा-या हस्तकला सहकारी संस्थांना प्रदर्शन भरविण्यासाठी वर्षातून एकदा विशिष्ट रक्कमेची तरतूद केली आहे• अशा परिस्थितीत पुन्हा या संस्थेस प्रदर्शनामध्ये त्यांना सहभागी होण्याची संधी देऊ नये• त्यातूनही त्याना सहभागी व्हायचे असेल तर स्वखर्चाने स्टॉल उभारण्यास हरकत नसावी• त्यांचेऐवजी वैयक्तिक हस्तकलाकृती सादर करणा-या कलाकारांना अधिक संख्येने संधी द्यावी•

ड आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ यांचेकडून अशी व्यवस्था झाली पाहिजे की, वस्तु तयार झाल्यावर वस्तुची थोडीतरी किंमत त्याला विक्रीच्या आधी हातात पडावयास हवी• सर्व माल तयार होईपर्यंत कलाकार मोलमजूरीवर जात नाही• पर्यायाने या कालावधीत उत्पन्नाचे साधन नसते• विक्री होईपर्यंत उपजिविकेचे साधन नसते• या प्रश्नातून सोडवणूक करण्यासाठी थोडीतरी रक्कम त्यास आगाऊ हातात पडावयास हवी•

इ• आदिवासीमधील निरक्षरतेचे प्रमाण कमी करुन साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यात यावे, जेणेकरुन योजनांची माहिती होईल• प्रशिक्षण संदर्भातही माहिती घेतील व आदिवासींची चौकस बुध्दीही वाढेल•

फ• आदिवासी हस्तोद्योजकांना कच्चामाल उदा•बांबू, गवत विशिष्ट प्रकारची लाकडे इ•पुरविण्याकरिता वनविषयक कायद्यात योग्य ती तरतूद करण्यात यावी•

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य,
२८, क्वीन्स गार्डन, पुणे-१

" आदिवासी हस्तकलेच्या विकासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचा सहभाग "

## आदिवासी हस्तकलाकारांकरीता प्रश्नावली

प्रपत्र क्र. १

### प्रास्ताविक माहिती

१. हस्तकलाकाराचे संपूर्ण नांव :

पाडा : गांव :

तालुका: जिल्हा :

२. मुख्य व्यवसाय : शेती/शेतमजूरी/कलाकृती निर्मिती/अन्य

३. हस्तकलाकाराचे वय :...........वर्षे, स्त्री/पुरुष

४. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न :......................
[शेतीपासून मिळणारे]

५. हस्तकलाकृतींपासून मिळाणारे वार्षिक उत्पन्न: ..............रुपये

६. हस्तकलाकाराचे शिक्षण : ........................

### हस्तकलाकृतींविषयी माहिती

७. हस्तकला प्रकार : घरगुती वापरातील वस्तू/लगदयापासून /लाकूड किंवा गवतापासून/वनऔषधे/बांबूकाम/वारली चित्रकला/आंबाडी वस्तू/धातूकाम/लाकडी मुखवटे/विणकाम

८. आदिवासी हस्तकला : व्यक्तीगत / व्यावसायिक / नोंदणीकृत संस्थेमार्फत
अन्य

९. व्यक्तीगत हस्तकला असल्यास : १] प्रशिक्षित / अप्रशिक्षित
२] परंपरागत व्यवसाय/अपरंपरागत व्यवसाय

१०. नोंदणीकृत संस्थेमार्फत हस्तकला करीत असल्यास
संस्थेमधील सभासद संख्या :
कुशल / अकुशल कामगार

११. संस्थेमार्फत प्रदर्शने भरविली जातात का? : होय / नाही

१२. त्यापासून हस्तकला कारागीराला मिळणारे वार्षिक उत्पन्न :--------

१३. नोंदणीकृत संस्थेला मिळणारे आर्थिक सहाय्य : बँक/शासनाकडून मदत/
सर्व सभासदांकडून जमा केलेले
भाग-भांडवल

१४. नोंदणीकृत संस्थेतील हस्तकलाकृतींची विक्री व्यवस्था : प्रदर्शन / डिपार्टमेंटल स्टोअर्स/
दुकानांमधून विक्रीस ठेवणे/
संस्थेचे स्वतःचे दुकान.

१५. भागभांडवलाची मर्यादा : ------------------रुपये.

१६. व्यक्तीगत हस्तकलाकाराला उपलब्ध असलेली भागभांडवलाची साधने : घरच्या घरी/संस्था किंवा बँक/
सावकार / अन्य

१७. शासनाकडून आर्थिक मदत मिळत असल्यास : रु. ५०० ते १०००/
रु. १००१ ते १५००
रु. १५०१ ते २०००
रु. २००० ते ३०००

१८. व्यक्तीगत हस्तकलेची विक्री व्यवस्था : आठवडे बाजार /दुकानांमधून विक्रीस
ठेवणे/घरगुती विक्री/फिरती विक्री
प्रदर्शन / डिपार्टमेंटल स्टोअर्स/अन्य

१९. विक्रीला मिळणारा प्रतिसाद : अल्प / मध्यम /सर्वसाधारण / चांगला /
उत्कृष्ठ

२०. हस्तकलावस्तूंच्या निर्मितीसाठी कच्च्या मालाची उपलब्धता : स्थानिक ठिकाणी/जंगल/रानें/
बाहेरून विकत घेणे/
टाकाऊ वस्तूंपासून/अन्य

२१. हस्तकला व्यवसाय : कुटुंबातील अन्य सभासद गुंतलेले आहेत काय? होय/नाही
सभासद संख्या : ----------

२२. या व्यतिरिक्त बाहेरून कारागीर घेतले आहेत काय ? होय / नाही.
घेतले असल्यास सभासद संख्या : -------------

२३. बाहेरील सभासदांना दिले जाणारे वेतन प्रकार : रोजंदारीवर/
महिन्यावर / उत्पन्नावर

२४. बाहेरील सभासद : हंगामी / तात्पुरते / कायमस्वरूपी

२५. हस्तकला वस्तू निर्मितीसाठी जागेची उपलब्धता : घरातल्या घरात /
स्वतंत्र जागा/स्वतंत्र वर्कशॉप
भाड्याची जागा.

२६. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत भरविल्या जाणाऱ्या प्रदर्शनामध्ये
नियमित सहभाग घेता का? होय / नाही

२७. हस्तकला विक्रीसाठी कायमस्वरूपी बाजारपेठ : होय / नाही
उपलब्ध आहे का?

२८. कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध असल्यास : होय / नाही
हस्तकला व्यवसाय वृद्धींगत होईल का?

२९. हस्तकला व्यवसायासाठी प्रशिक्षण घेतले : होय / नाही
आहे का?

प्रशिक्षण घेतले असल्यास :

अ) प्रशिक्षण संस्था : ट्रायसेम /खादी ग्रामोद्योग /न्यूक्लिअस बजेट
प्रशिक्षण योजना / अन्य संस्था

ब) प्रशिक्षणाचा कालावधी : १५ दिवस / १ महिना / ३ महिने /
६ महिने / १२ महिने

क) प्रशिक्षण कालावधीत मानधन : मानधन देण्यात आले नाही / १०० /
२५० ते ३०० / ३०० ते ५००

ड) प्रशिक्षणाचा तुम्हाला झालेला उपयोग : ------------------------------------

इ] प्रशिक्षण संस्थेकडून अथवा इतर कोणी अनुदान : होय / नाही
उपलब्ध करून दिले का?

कर्ज अनुदान दिले असल्यास : ---------------- रूपये

फ] हस्तकला व्यवसायाचे प्रशिक्षण उपयोगी आहे : होय / नाही
असे तुम्हाला वाटते का?

२१] प्रशिक्षण घेतले नसल्यास :

अ. प्रशिक्षण न घेण्याचे कारण : १] प्रशिक्षणासाठी निवड झाली नाही.
२] प्रशिक्षणाची सोय नाही.
३] प्रशिक्षण कोठे मिळते याची माहिती नाही.
४] प्रशिक्षण कालावधीत राहणे, जेवणाची सोय नाही.
५] अपुरे मानधन

ब. प्रशिक्षण मिळावे असे तुम्हाला वाटते का? : होय / नाही

क. वाटत असल्यास कारण :

२२] आपल्याजवळ असलेल्या कलेच्या आधारे आपल्याला कायमस्वरूपी उपजिवीकेचे साधन उपलब्ध होण्याकरीता आदिवासी विकास विभाग व इतर विभागाकडून वा संस्थेकडून अपेक्षा / सूचना

दिनांक लाभार्थ्यांची सही

ठिकाण